म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
द्गा. क्र.

IRBK-0117167
IRBK-0117167

एका वेगळ्याच प्रसंगाने– अगदी ध्यानीमनी नसताना पूर्ण झाली.

त्याचे असे झाले, भ्रमंतीला निघालेले हे दोघे एकदा असेच दाट जंगलातून फिरत होते. आपापसात गप्पा मारण्यात ते इतके दंग झाले होते, की अचानक एक प्रचंड महाकाय हत्ती आपल्या-समोर येऊन उभा राहिला आहे, हे प्रथम त्यांच्या लक्षातच आले नाही. जंगलातल्या त्या दाट झुडुपातच त्या हत्तीचे वसतिस्थान होते. तिथे विश्रांती घेत असलेल्या त्या हत्तीला अचानक पाचोळ्या-वर वाजलेल्या पावलांचा आवाज ऐकू आला, आणि तोंड फिरवून आपल्या निवासस्थानाकडे येणाऱ्या त्या दोन परकीय शत्रूंकडे तो एकटक पाहत राहिला ! समोर उभे राहिलेले धूड हत्तीचे आहे, हे मॉन्सन आणि विल्सन या दोघांच्याही लगेच लक्षात आले.

क्षणभर दोन्ही प्रतिस्पर्धी एकमेकांकडे नुसतेच पाहत राहिले. पण दुसऱ्याच क्षणी हत्तीने आपली सोंड हवेत भिरकावून, कान हलवून जोरात चीत्कार केला; आणि एक पाऊल उचलले.

तो भयानक चीत्कार ऐकताच मॉन्सनच्या अंगातून भीतीचा शहारा थरथरत गेला. त्याचे केस ताठ उभे राहिले. खरे म्हणजे, मॉन्सन आणि विल्सन या दोघांच्याही जवळ बंदुका होत्या; पण बंदुका काढून नेम धरण्याइतका अवधी नव्हताच मुळी. त्यामुळे अर्थातच आपला जीव वाचवण्यासाठी दोघेही धूम पळत सुटले.

हत्तीने पाठलाग सुरू केला.

विल्सन जवळच्याच एका झाडावर सरसर चढला आणि बचावला. पण मॉन्सनला तेवढाही वेळ मिळाला नाही. झाडाजवळ पोचताच त्याने मागे वळून पाहिले, तो हत्तीची सोंड त्याच्या डोक्यावरच काही इंचांवर नेम धरू [illegible] ...पून मॉन्सनला आवळण्यास हत्तीला एक

IRBK-0117167

IRBK-0117167

प्रसंग आला की माणूस जीव वाचवण्यासाठी वाटेल ती धडपड करतो. मॉन्सनचे तसेच झाले. हत्तीच्या सोंडेखालून झुकांडी देऊन तो निसटला. पण जाणार कुठे ? लपणार कुठे ? या महाकाय प्राण्याच्या तावडीतून सुटण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे जवळच असलेल्या भल्यामोठ्या टेकडीवजा मुंग्यांच्या वारुळाचा आश्रय घेणे. मॉन्सनने तेच केले. तो त्या टेकडीच्या आडोशाला लपला.

पण हत्तीने पाठलाग सोडला नाही. आपल्या भूमीवर आक्रमण करून आलेल्या शत्रूला नेस्तनाबूत केल्याशिवाय त्याला चैन पडणार नव्हते. मुंग्यांच्या टेकडीआड दडलेल्या मॉन्सनला टिपून त्याने चाल बदलली, आणि चार-सहा पावलांतच त्याने ते वारूळ गाठले. गगनभेदी चीत्कार करीत आपला अजस्र पाय त्याने त्या वारुळावर दाबला. त्याबरोबर वारूळ मोडले. धुळीचा खकाणा उडाला; आणि आतून बाहेर पडलेल्या, सैरावैरा धावणाऱ्या मुंग्या मॉन्सनच्या अंगावर चढल्या.

मॉन्सन तिथून धावला. अंगावरच्या मुंग्या झटकायला वेळ नव्हताच. खरे म्हणजे मुंग्यांनी घेतलेले चावेसुद्धा त्याला त्या वेळी कळत नव्हते. जीव वाचवण्यासाठी तो आकान्ताने धडपड करीत होता.

मॉन्सनने मग धाव घेतली ती काटेरी झुडुपांत. त्यात त्याने स्वत:ला झोकून दिले.

पायाखाली येईल ते तुडवीत, आणि रागाने मोठा चीत्कार करीत हत्तीही त्याच्यामागे धावला. तो ती काटेरी झुडुपे तुडवू लागला. त्याच्याही पायात त्याचे काटे घुसून रक्त येऊ लागले; पण हत्तीने पर्वा केली नाही. आपल्या शत्रूला गारद करण्याचा त्या

हत्तीने जणू चंगच बांधला होता! क्षणाक्षणाला झुडुपात दडलेल्या मॉन्सनला भीती वाटत होती, की पुढचा हत्तीचा पाय बहुधा आपल्या अंगावरच पडणार. काटयांतून सरपटतच तो हत्तीला चुकवायचा प्रयत्न करीत होता; पण हत्तीही काही कमी नव्हता. तो फिरून फिरून त्याच्यावर चाल करून येत होता. अखेर त्याने मॉन्सनला गाठलेच.


त्या काटेरी झुडुपांमधून बाहेर पडण्यासाठी मॉन्सनने एकदा हळूच आपले हॅट घातलेले डोके वर उचलून पाहिले आणि त्याला कळून चुकले, की आपल्या आयुष्याचा शेवट आता अगदी जवळ आला आहे. भोवताली दिसणाऱ्या जगाकडे मॉन्सनने एकदा पाहून घेतले न घेतले, तोच हत्तीने आपली सोंड त्या काटेरी झुडुपांत खुपसून त्याला वर उचलले आणि भिरकावून दिले.

मॉन्सनच्या तोंडातून रक्त वाहू लागले. तरीही तो तसाच उठून धडपडत धावू लागला. मॉन्सनजवळ अजूनही त्याची बंदूक होती. पण ती काढून, नेम धरून उडवण्याइतका अवधी त्याला मिळतच नव्हता.

तरीही मॉन्सन अखेर वाचला. कसा ?

तो एक चमत्कारच म्हटला पाहिजे. धावता धावता मॉन्सन पुन्हा अडखळून पडला आणि त्याबरोबरच त्याच्या डोक्यावरची लोखंडी हॅट उडून मागे पडली. ती घेण्यासाठी मॉन्सनने मागे वळून पाहिले. पण ती लोखंडी हॅट केव्हाच हत्तीच्या पायाखाली गेली होती. नाही तरी आता मरायचेच आहे, तेव्हा मरताना डोक्यावर टोपी असली काय नि नसली काय– असा विचार करून मॉन्सन-हत्तीचा पुढचा पाय आपल्या अंगावर केव्हा पडतो आणि आपला चुराडा केव्हा होतो याची वाट पाहत डोळे मिटून पडला.

कारण आता तो इतका थकला होता, की पाऊलभरसुद्धा धावण्याचे त्राण त्याच्या अंगात राहिले नव्हते.



पण हत्तीचा पाय त्याच्या अंगावर पडलाच नाही ! मॉन्सनला आश्चर्य वाटले. त्याने डोळे उघडून पाहिले, तेव्हा त्याला दिसले, की, तो हत्ती त्या लोखंडी हॅटवरच अंगात आल्यासारखा नाचतो

आहे. थोडा वेळ नाचल्यानंतर हत्ती एकदम स्तब्ध उभा राहिला. त्याचे हलणारे कान मात्र कसली तरी चाहूल घेत होते. अजूनही तो हत्ती त्या लोखंडी हॅटवरच पाय देऊन विजयोन्मादात उभा होता. ती लोखंडी हॅट पायाखाली आली, तेव्हा त्याला वाटले, की मॉन्सनच आपल्या पायाखाली आला आहे, आणि त्यालाच आपण तुडवले आहे. बहुधा याच कल्पनेने हॅट तुडवून झाल्यावर हत्ती थोडा वेळ स्तब्ध उभा राहिला आणि मग आपल्या निवासस्थानाकडे निघून गेला. मॉन्सनने सूटकेचा श्वास टाकला.

प्राणावरचे संकट हॅटवर निभावले, या खुषीतच मग अंगावरच्या जखमा विसरून मॉन्सन उठून चालायला लागला. त्याच्या अंगात एक नवेच बळ संचारले. मॉन्सन कॅम्पवर येऊन विल्सनला मिळाला, पण तरीदेखील त्याला बरे व्हायला खूपच दिवस लागले.

काही का असेना, अखेर मॉन्सनने साहस केले होते. मृत्यूशी झुंज दिली होती. लोकांना अभिमानाने सांगावे असे आता त्याच्याजवळ काही तरी खासच होते.

★

२

*        *        *        *        *        *        *        *        *

## ते एकोणतीस तास

'वाचवाऽ वाचवाऽऽ– मी पाण्यात पडलो आहे. मला वर घ्या...हेन्री, रॉजर्स ऽ, मी इथे आहे पाण्यात–'

पण छे, त्याचे शब्द कुणालाच ऐकू गेले नाहीत; आणि आपल्या बोटीवरचा एक माणूस कमी झाला आहे, हे लक्षातही न घेता 'सिल्व्हर स्प्रे' बोट हळूहळू दूर निघून गेली, दिसेनाशी झाली.

अर्ने निकोलसन पाहतच राहिला. हे काय घडले ते त्याला कळेचना.

क्षणापूर्वी तर आपण बोटीवर होतो. डेकवर कठड्याला रेलून आरामात उभे होतो. 'दर्या किनारी माझी होडी डुले' हे गीत शिळेवर किती मजेत वाजवत होतो. शीळ वाजवता वाजवताच आपण आणखी मागे रेलली. आणि–

आता आपण पाण्यात पडलो आहोत. प्रवाहाशी झगडतो आहोत. जीव वाचवण्यासाठी धडपडतो आहोत. असे कसे झाले ?

अर्नेला कळले नाही, पण एक जोराची लाट बोटीला थप्पड मारून गेली, बोट हलली, आणि बेसावधपणे रेललेल्या अर्ने निकोलसनचा तोल गेला.

दूर दूर जाणारी बोट दिसेनाशी झाली, आणि अर्नेच्या आयुष्यातले भीषण नाटय सुरू झाले. आपण कुठल्या भयंकर संकटात सापडलो आहोत याची त्याला जाणीव झाली आणि अर्नेचे शरीर भीतीने थरथरले. पाण्यावर जोरजोरात हात-पाय मारीत तो ओरडत राहिला, ' वाचवा ! मला वाचवा ! ! '

पण व्यर्थ ! अर्नेचा आवाज ऐकायला जवळपास कुणीच नव्हते. त्या अथांग पाण्यात तो एकटाच होता. अगदी एकटा. उसळणाऱ्या लाटा त्याला पोटात घ्यायला टपल्या होत्या. चारी बाजूंनी त्या अंगावर धावून येत आहेत असे अर्नेला वाटले. ' मी दर्याचा राजा ' म्हणत एरवी समुद्राच्या अंगावर नाचणारा अर्ने आज त्याच समुद्राचे भक्ष्य झाला होता ! अक्राळविक्राळ जबडा पसरलेला हा समुद्र आपला घास घेणार, या विचाराने अर्ने हताश झाला. आपले अंग गोठत चालले आहे, शरीरातली ताकद कमी व्हायला लागली आहे, असे त्याला वाटले.

इतक्यात लहानपणी मास्तरांनी फळयावर घोटून घेतलेले एक वाक्य त्याला आठवले. संकटाच्या वेळी माणसाने भीतीने गांगरून जाऊ नये; आपले डोके शांत ठेवून विचार करावा, म्हणजे संकटातून सुटण्याचा मार्ग सापडतोच. एक दिवस गृहपाठ आणला नव्हता, म्हणून मास्तरांनी पन्नास वेळा हे वाक्य त्याला लिहायला लावले, आणि पाठ करून घेतले होते; ते आत्ता उपयोगी पडू लागले.

डोके थंड ठेवले पाहिजे, विचार केला पाहिजे, संकटातून मार्ग

काढला पाहिजे, असे मनाशी घोकत घोरत अर्ने पाण्यात हात-पाय हलवीत राहिला. तसे अर्नेला चांगले पोहता येत होतेच, आणि त्याची तब्येतही सणसणीत होती. तरी देखील तो किती वेळ तग धरू शकला असता ? जवळपास कुठे तरी किनारा आहे, कुठे तरी आपल्याला जमिनीवर पाय टेकता येतील याची खात्री असली तरच पोहताना जोर येतो. पुसटशी आशाही माणसाला धीर देते. पण इथे तर पाहावे तिकडे नुसते हिरवेगार पाणीच पाणी दिसत होते. भोवती समुद्र, वर निळेभोर आकाश. जमिनीचा पत्ताच नव्हता आणि असण्याची शक्यताही नव्हती. कारण अर्ने फ्लोरिडा आणि क्यूबा यांच्यामध्ये पसरलेल्या खोल समुद्रात पडला होता.

बरे, सारखे हातपाय तरी तो किती वेळ मारू शकला असता? जिवाच्या आकांताने एकच गोष्ट करता येण्यासारखी होती– ती म्हणजे पाण्यावर नुसते तरंगत राहणे. तासामागून तास तरंगणे आणि जवळून जाणाऱ्या एखाद्या जहाजाची वाट पाहणे– अर्नेला हे एवढेच करणे शक्य होते. तो तरंगत राहिला. एकीकडे तरंगताना परमेश्वराची प्रार्थना करीत एखादी बोट जवळून जाते का याची वाट पाहू लागला. पण तासामागून तास लोटले, तरी त्या पाण्यावर कसलीच हालचाल दिसेना. नुसते वर आकाश, आणि सभोवती अथांग पाणी !

चार हजार मैल दूर असलेल्या आपल्या घराची अर्नेला तीव्रतेने आठवण व्हायला लागली. घरची माणसे–त्यांना काही कल्पनाही नसेल. आरामात जेवून खाऊन गप्पा मारीत बसली असतील, आणि आपण मात्र इथे एकटे मृत्यूशी झगडतो आहोत. त्या क्षणी अर्नेला वाटले की, या जगात आपल्याइतके दुर्दैवी आणि एकाकी कुणीही नसेल. आपल्या बोटीवरच्या माणसांच्या सुद्धा आपण बोटीवर

नाही हे लक्षात आले असेल का ? बहुधा येणार नाही; कारण अर्नेची ड्यूटी सकाळी सुरू होणार होती. तोपर्यंत त्याच्या केबिनचे दार कुणीच वाजवणार नव्हते. आणि आधी लक्षात आले तरी काय उपयोग ? एव्हाना बोट किती तरी मैलांचे अंतर कापून गेलेली असणार. तेव्हा, ते कसा शोध घेणार ? फार तर आपल्या घरी रेडिओ-संदेश पाठवतील– ' अर्ने निकोलसन बेपत्ता आहे ' म्हणून.

सतत पाण्यात राहून अर्नेचे शरीर गार पडायला लागले. रात्र उलटून गेली तसा हवेतला गारठाही वाढायला लागला. अंगावरच्या कपड्यांनिशीच अर्ने समुद्रात पडला होता, आणि तसाच पोहत होता. पण आता त्याला अंगावरच्या कपड्यांचा त्रास वाटायला लागला, आणि निदान पँट तरी काढावी असा विचार करून त्याने बक्कल सैल केले, तोच जवळून सुळकन काही तरी गेले, आणि अर्नेच्या डोक्यात सणक आली.

शार्क !



समुद्रात शार्क मासे आहेत हे तो आत्तापर्यंत विसरूनच गेला होता. बाप रे ! म्हणजे आता हे आणखी एक संकट ! अंगावरची पँट, शर्ट तशीच राहू देण्यानेच आता या संकटाशी मुकाबला करता येईल थोडाफार. कारण एखाद्या शार्कने पाय धरण्याचा प्रयत्न केला, तरी पँटचे सैल टोक त्याच्या तोंडात आधी जाईल. शार्क मासे धोकादायक तर खरेच; पण ते फार भित्रेही असतात असे अर्नेने एकले होते. त्यांना भिवविण्यासाठी त्याने पायांतले मोजे काढून घेतले. शार्क माशांचा हल्ला झालाच, तर संरक्षण करण्यासाठी अर्नेच्या हातात फक्त दोन गोष्टी होत्या. मोजे आणि परमेश्वराची प्रार्थना.

प्रार्थना करता करता अर्नेला थकव्याने झापड यायला लागली. प्रयासाने डोळे उघडे ठेवून तो तरंगण्याचा प्रयत्न करू लागला, तरीही मधूनच त्याला डुलकी लागे, आणि डोके पाण्याखाली जाई. नाकातोंडात पाणी गेले, की तो गुदमरून जागा होई, आणि पुन्हा हातपाय मारी. मधूनच शार्क मासे जवळ येताहेत असे वाटले, की तो मोजे पाण्यात हलवी किंवा आपले डोके पाण्याखाली घेई.

सबंध रात्रीत त्याला फक्त एकदाच जहाजाचे दिवे दिसले, पण ते खूप दूर होते. अर्ने निकोलसन ते जहाज जवळ येण्याची मोठ्या आतुरतेने वाट पाहू लागला. थोडे हाकेच्या टप्प्यात आले की, तो जिवाच्या आकांताने ओरडणार होता.

पण हाय ! ते जहाज दूरवरूनच पुन्हा दिसेनासे झाले, आणि अर्ने निकोलसनची आशा मावळली.

दिवस उजाडला तसे अर्नेला खूप बरे वाटले. रात्री मनात येणारे नैराश्याचे विचार सूर्याच्या कोवळ्या किरणांनी दूर पळवले. नव्या उमेदीने अर्ने पुन्हा पोहू लागला; पण आता त्याचे

शरीर फार थकले होते. खाऱ्या पाण्यात राहून शरीर कचकचले होते. स्नायू ताठरले होते. घशाला शोष पडला होता. दिवसाच्या उजेडात आणखी एक जहाज दूरून जाताना दिसले. अर्ने जोर-जोरात ओरडत त्या जहाजाच्या दिशेने पोहू लागला; पण थोड्याच वेळात त्याच्या लक्षात आले की, आपले प्रयत्न विफल झाले आहेत. त्या जहाजाने कसलीही दखल घेतली नाही, कारण आवाज तिथ-पर्यंत गेलाच नाही. पण अर्नेला एकच समाधान वाटले, की तो जिथे पडला होता, तिथून जहाजांची वाहतूक चालू होती. ह्या नाही त्या– कुठल्या तरी जहाजाच्या दृष्टीला आपण पडू, अशी अर्नेला आशा वाटली.

आणि खरोखरच नंतरच्या काही तासांत चार-पाच जहाजे त्या भागातून गेली. काही त्याच्या जवळूनही गेली. अर्ने निकोल-सनने तोंडात बोटे घालून शिट्या वाजवल्या, हात हलवून हाकारे दिले; पण एकाही जहाजाचे त्याच्याकडे लक्ष गेले नाही. आपल्या-जवळ एक तरी छोटा आरसा असायला हवा होता असे त्याला तीव्रतेने वाटले. त्याचे किरण टाकून जहाजांना इशारा देता आला असता.

एखाद्या बहिऱ्या माणसासारखी ती जहाजे त्याला ओलांडून पुढे निघून जात असलेली पाहून अर्ने हताश झाला. दुपारचे ऊन आता भाजत होते, घसा तहानेने कोरडा झाला होता; पण पाण्यात असूनही अर्नेला प्यायला थेंबभरही पाणी नव्हते. भुकेने आतडी पिळवटून निघाली होती. थकव्याने पुन्हा पुन्हा झापड येत होती. तरीही शार्क माशांच्या भीतीने, आणि मुख्यतः जगण्याच्या दुर्दम्य इच्छेने अर्ने हातपाय हलवीत होता.

चोवीस तास उलटून गेले. अजूनही अर्ने पाण्यातच होता.

मदतीचा हात कुठूनही पुढे येत नव्हता. जसजशी रात्र चढायला लागली, तसतशी अर्नेची जगण्याची आशा माळवत चालली. परमेश्वराचे नाव आठवीत तो डोळे मिटून मृत्यूची वाट पाहू लागला.

आणि एकाएकी त्याच्या डोळ्यांवर प्रकाशाचा झोत पडला. अर्नेने डोळे उघडले आणि आनंदाने चीत्कार केला. कारण एक जहाज त्याच्या जवळून चालले होते. अगदी जवळून. अर्ने सगळी ताकद एकवटून ओरडला, 'वाचवा! वाचवा! मी पाण्यात पडलो आहे– मदत करा !'

खरे म्हणजे थकव्याने अर्नेचा आवाज अगदी क्षीण झाला होता. पण कसा कोण जाणे, बोटीवरच्या एका माणसाला तो ऐकू गेला. लागलीच जहाजाच्या एंजिनचा आवाज कमी झाला, त्याचा वेग मंदावला. जहाजाचा प्रकाश अर्नेचा शोध घेऊ लागला, आणि तो दिसताच एक लाईफ बोट त्याच्याकडे तरंगत आली. अर्नेला पाण्यातून वर ओढून घेतले.

या वेळपर्यंत अर्ने निकोलसनला पाण्यात पडून बरोबर एकोणतीस तास झाले होते. अन्नपाण्यावाचून सतत एवढे तास अर्ने पाण्यात पडून कसा राहू शकला याचे बोटीच्या कप्तानाला आश्चर्य वाटले.

ज्या धैर्याने अर्नेने या संकटाशी मुकाबला केला त्याबद्दल त्याचे कौतुक तर सगळ्यांनीच केले.

★

३

*   *   *   *   *   *   *   *   *

## सरस्वतीची नर्मदेवर मात

त्या वर्षी सगळीकडेच पाऊस खूप झाला होता. त्याआधीची दोन-तीन वर्षे पावसाने म्हणावा तसा हात दिला नव्हता. काही ठिकाणी तर चांगलाच दुष्काळ पडला होता. विहिरी आटल्या होत्या. हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना वणवण हिंडावं लागलं होतं. पीकपाणी कमी आलं होतं. अन् मग महागाई पण वाढली होती.

त्यामुळेच सुकलेल्या, भेगाळलेल्या धरणीनं पावसाचं स्वागत केलं. पहिलंच पावसाचं नक्षत्र जोरदार वृष्टी करून गेलं, त्यामुळं शेतकऱ्यांनी उत्साहानं पेरण्या केल्या. नदीनाले वाहू लागले. विहिरी पाण्यानं भरल्या. यंदा पीक सोळा आणे येणार म्हणून शेतकरी आनंदित झाला. त्यानं पावसाची पूजा बांधली.

पण मग आलेला पाहुणा लवकर हललाच नाही, खूप दिवस मुक्काम ठोकून राहिला, म्हणजे घरच्या यजमानाची जशी पंचाईत

होते, तशीच शेतकऱ्यांची झाली. पाऊस जो धुंवाधार लागला तो काही हटण्याचं लक्षण दिसेना. आता थोडी उघडीप हवी होती; पण पाऊस मुळी संपेचना. विहिरी गच्च भरल्या, नाले तुडुंब भरून वाहायला लागले, नद्यांना पूर आले.

रोज पेपर उघडावा, तो आज ह्या नदीला पूर आला, उद्या त्या गावात पाणी शिरलं, अमकं खेडं पाण्याखाली गेलं– अशा बातम्या वाचायला मिळायच्या.

त्याच पावसाळ्यातली ही गोष्ट आहे.

मध्यप्रदेशातल्या हुशंगाबादपासून जवळच एक लहानसं गाव आहे. मालाखेडी हे त्याचं नाव. गाव अगदी छोटं, दीड-दोनशे घरांचं. एका बाजूला एक छोटीशी टेकडी, आणि दुसऱ्या बाजूला खळखळ वाहणारी नर्मदा नदी.

याच गावात काशिराम नावाचा कोळी राहत होता. नर्मदेच्या ह्या तीरावरच्या लोकांना आपल्या होडीतून दुसऱ्या तीरावर पोचवायचं, हा त्याचा मुख्य धंदा होता. पहाटेपासून आपली होडी सज्ज करून तो तीरावर हजर व्हायचा, आणि दिवस बुडेपर्यंत खेपा करायचा. कमाई फार होत नव्हती, तरी त्यात दोघांचं भागत होतं– त्याचं आणि सरस्वतीचं.

हो, काशिरामला एक मुलगी होती सोळा-सतरा वर्षांची. तिचं नाव सरस्वती. सरस्वती मोठी चुणचुणीत मुलगी होती. काळीसावळीच, पण धारदार नाकाची. टपोऱ्या डोळ्यांची. सरस्वतीला तिच्या बापानं शाळेत घातली होती. पोरीनं शिकावं असं त्याला वाटत होतं. पण सरस्वतीचं शिक्षणात फारसं लक्ष नव्हतं. लहानपणापासून सरस्वतीला धावणं-पळणं, सरसर झाडावर चढणं, डोंगरदऱ्या पालथ्या घालणं याचं वेड जास्त होतं. पोहायला

तर ती कधीच शिकली, आणि मग थोडी मोठी होताच सरस्वतीनं शाळा सोडली; आणि ती बापाबरोबर नाव वल्हवायला लागली. कधी कधी एकटीच दूर जाऊन नर्मदेतून मासे पकडून आणायची. सरस्वतीला पाण्याचं फार वेड होतं. नर्मदेवर तर तिचा फार जीव होता. तासन्तास नदीच्या काठावर बसून, पाण्यात पाय सोडून, सरस्वती नर्मदेला आपल्या मनच्या गोष्टी सांगे.

सरस्वती वयात आली, तसा काशीराम तिच्या लग्नाचे बेत करू लागला. आपल्या मुलीला योग्य नवरा मिळावा. म्हणून आसपासच्या गावांतनं चौकशी करू लागला. एक मुलगा त्याच्या मनात भरलाही होता. पावसाळा संपला. की त्याच्याशी पुढची बोलणी करायची, या विचारातच काशिराम त्या दिवशी झोपला.

बाहेर पाऊस पडतच होता. तसा तो गेले तीन दिवस सतत पडत होता. नर्मदा फुगली होती आणि बघता बघता नर्मदेनं रौद्र स्वरूप धारण केलं. काठावरचं असेल नसेल ते आपल्या पाण्याखाली घेत ती सुसाट धावत होती. पाण्याला भलताच वेग आला होता. बघता बघता पुराचं पाणी चढायला लागलं. मालाखेडी गावात घुसलं. झोपड्यांतून, घराच्या दरवाज्यांतून आत शिरलं.

दिवसभर थकूनभागून गाढ झोपलेली माणसं अंगाखाली ओल जाणवताच जागी झाली. अंधारातच डोळे फाडून बघायला लागली. मिनिटा मिनिटाला पाणी वाढतच होतं. घोट्यापर्यंत होतं ते गुढग्यापर्यंत आलं. घरातले डबे, अंथरुणं पाण्यावर तरंगायला लागले.

आणि मग सगळीकडे एकच हाहा:कार उडाला. सगळी

चीजवस्तू नर्मदेला अर्पण करून माणसं जीव वाचवण्यासाठी धावत सुटली, ती टेकडीकडे. अंधार मी म्हणत होता. घाबरण्यानं पायाखालची नेहमीची वाटसुद्धा सुधरत नव्हती. सगळाच लोंढा एका ठिकाणी निघाला. माणसं अंधारात एकमेकांवर आदळत होती. कुणाच्या कडेवर लहान मूल, तर कुणाच्या पाठीवर म्हातारं माणूस. जीव वाचवण्यासाठी माणसं जिवाच्या आकांतानं टेकडी-कडे धावत होती.

या सगळ्या गडबडीचा काशिरामला आणि सरस्वतीला पत्ताच नव्हता. कारण त्यांची वस्ती एका उंचवट्यावर होती. पाण्यानं अजून तिथपर्यंत स्पर्श केला नव्हता. त्यामुळे तिथले लोक शांत झोपले होते.

सकाळी जाग आल्यावर सरस्वती नेहमीप्रमाणे नदीकडे जाण्यासाठी झोपडीच्या बाहेर आली; आणि बघते तो काय !

सारा गाव पाण्याखाली गेलेला. झोपड्यांची छपरं पाण्यावर तरंगत होती. झाडं अर्धीअधिक पाण्यात बुडालेली होती. आणि त्यांच्या शेंड्यावर जीव मुठीत धरून बसलेली माणसं मदतीसाठी ओरडत होती. जे टेकडीपर्यंत पोचले त्यांनी टेकडीचा आसरा घेतला होता, पण ती टेकडीही अर्धीअधिक पाण्यात बुडालेली होती.

सरस्वतीनं बापाला हलवून उठवलं, त्यानं आपल्या शेजाऱ्यांना उठवलं, आणि सगळेजण भयचकित नजरेनं नर्मदेचं ते तांडव पाहत राहिले. पाणी क्षणाक्षणाला चढत होतं. अडकलेल्या माणसांची स्थिती भयानक होत चालली. त्यांच्या किंकाळ्या वाढल्या होत्या.

त्यांना मदत करायला हवी होती, त्यांचे प्राण वाचवायला हवे होते. लहान लहान मुलं, फांदीला गच्च धरून बसलेल्या बायका,

टेकडीवर अडकलेले म्हातारेकोतारे...मृत्यूनं त्यांचा घास घेण्यापूर्वीच त्यांची सुटका करायला हवी होती.

पण कशी ? या उफाळणाऱ्या नर्मदेत आपली होडी लोटणार कोण ? लोटलेली होडी तिथवर जाईल अशी एकाही नावाड्याला खात्री वाटेना, कारण नर्मदेच्या पाण्याचा वेग प्रचंड होता. एखाद्या भोवऱ्यात नाव सापडली, तर पाचोळ्यासारखी गरगरत कुठे जाईल याचा पत्ताही लागायचा नाही.

'बाबा, त्यांना वाचवा ना.' सरस्वती व्याकुळ होऊन म्हणाली.

'पोरी, या प्रलयात कसं जाणार ? तिथवर पोचणंही अशक्य आहे.' काशिरामनं हताश होऊन म्हटलं.

'मग काय, उघड्या डोळ्यांनी त्यांचा जीव गेलेला पाहणार?'

'नर्मदामातेची मर्जी !' एकानं नदीकडं पाहून हात जोडले.

'छे, छे ! अशी कशी तिची इच्छा असेल? आई आहे ना ती आपली ! मग आई कधी मुलाला खाईल ? तुमची कुणाची हिंमत होत नसेल, तर मी जाते होडी घेऊन.'

'ए पोरी, उगीच भलतं धाडस करू नकोस. तुझ्यापेक्षा जास्त पावसाळे पाहूयलेत आम्ही. एवढे कसलेले नावाडी आहेत तरी हिंमत होत नाही त्यांची, आणि तू निघालीस नर्मदेवर मात करायला !' एका म्हातारीनं तिला आडवलं. पण सरस्वतीचा निर्धार पक्का झाला होता.

'नाही, ही माणसं बुडताना मी उघड्या डोळ्यांनी इथं बसून पाहू शकणार नाही. मी चालले.'

असं म्हणून सरस्वती निघाली. 'पोरी, पोरी' करून बापानं तिला आडवायचा प्रयत्न केला. पण सरस्वती ऐकेना.

ती निघाली. चिखलात रुतून बसलेली आपली नाव तिनं

ओढून काढली आणि 'जय नर्मदामाते' म्हणत हाकारली.
श्वास रोखून सगळी मंडळी बघत राहिली.



सरस्वतीनं पाण्यात नाव लोटली खरी, पण टेकडीपर्यंतचं अंतर काटणं सोपं मुळीच नव्हतं. क्षणाक्षणाला मृत्यूशी सामना होता. पण सरस्वती हिंमत हारली नाही. तिनं धैर्यानं सगळी शक्ती एकवटून आपली नाव अखेरीस टेकडीला लावली. त्यात घेता येतील तेवढी माणसे घेतली, आणि परतीचा प्रवास सुरू केला.

नेटानं तिनं नाव पुन्हा ऐलतीराला लावली. त्यातल्या माणसांना किनाऱ्यावर उतरून दिले, आणि त्यांचे आशीर्वाद घेत तिनं पुन्हा नाव हाकारली.

एक– दोन... तीन... सतत पंधरा तास नाव चालवून, आपल्या लहानशा होडीने, नर्मदेच्या तुफानी पुराची पर्वा न करता सरस्वतीनं एक-दोन नाही, तर दीडशे लोकांचे प्राण वाचवले. त्यात

लहान मुलं होती तशीच ऐंशी वर्षांची वृद्ध माणसेही होती.

सरस्वतीचं हे धैर्य आणि शौर्य पाहून सारे थक्क झाले. ज्यांचे प्राण वाचले त्या लोकांनी तर तिला तोंडभरून दुवा दिलाच, पण राज्यसरकारनंही या शूर धीवरकन्येला पाचशे रुपयांचं बक्षीस दिलं. तिला वीरबाला हा किताब दिला.

इंदूरच्या लोकांनी तर वीरबाला सरस्वती हिला इंदूरला बोलावून तिचा जाहीर सत्कार केला, आणि सात हजारांची थैली तिला दिली. काही लोकांनी उत्स्फूर्तपणे तिला नर्मदारत्न ही पदवी बहाल केली !

सरस्वती इंदूरला जाण्यासाठी प्रथमच मोटारीत बसली. तोवर तिनं कधी मोटारीतून प्रवास केलेला नव्हता ! विमान तर तिनं पाहिलंच नव्हतं, त्यामुळे 'तुला इंदूरला काय काय बघायचं आहे ?' असं तिला विचारल्यावर तिनं विमान बघण्याची इच्छा प्रदर्शित केली.

अर्थात तिला विमान बघायला तर मिळालंच, पण विमानातून एक फेरफटकाही तिनं केला.

★

४

* * * * * * * * *

## सागरात रंगलेलं नाटय

कौसल्येला मुंबईत येऊन तसे फार दिवस झाले नव्हते. खरं तर महालक्ष्मीचं देऊळ, आणि त्याभोवतालचा परिसर, यापलीकडे तिला मुंबईची फारशी माहितीही नव्हती. देवळाला लागून असलेल्या धर्मशाळेत कौसल्या राहात होती, एकटीच.

कौसल्याराणी सुखदेव खिन्हे, ही मूळची उत्तर प्रदेशातील महिषी नावाच्या एका गावची गढवाली स्त्री होती. दिवसभर शेतात राबावं, मजुरी करावी,आणि मिळेल त्यात प्रपंच चालवावा; असंच तिचं साधं, सरळ आयुष्य होतं. एका दिवसासारखाच दुसरा दिवस... तसाच तिसरा– तसाच चवथा, सुतासारखं सरळ आयुष्य. त्यात चढ-उतार, अविस्मरणीय अनुभव वगैरे काहीच नव्हतं. अर्थात कौसल्येलाही त्याची खंत नव्हती. कारण कौसल्या अशिक्षित होती. जन्मापासून आपल्या महिषी खेडयातली मुलं-माणसं आणि गुरंढोरं, यापलीकडे तिनं काही जग पाहिलेलंच नव्हतं.

एक दिवस संध्याकाळच्या, अंगणात खाटलं टाकून नात्याच्या, शेजारच्या चार आयाबाया बसल्या होत्या, त्यांतच कौसल्या पण बसली होती. आज हिरामणी बैठकीत नव्हती. कौसल्येनं विचारलं, 'आज हिरू का नाही आली?' त्यावर कुणी तरी तिला सांगितलं, की हिरूच्या नवऱ्याला मुंबईत कामधंदा मिळाला आहे. तो उद्या तिला घेऊन जायचाय.

कौसल्येला ही बातमी नवी होती. 'ही मुंबई म्हंजी काय? आणि ती कुठं आहे?' तिनं विचारलं. जमलेल्या बायकांना तरीं मुंबई कुठं माहीत होती!

का कोण जाणे, कौसल्येला मुंबई हा शब्द आवडला. तिनं मग हिरूलाच गाठून विचारलं. हिरामणीनं तिच्या नवऱ्यानं तिला सांगितलेल्या मुंबईच्या गोष्टी सांगितल्या. मुंबई खूप मोठ्ठं गाव आहे. तिथं खूप मोठ्या उंच उंच इमारती आहेत, अगदी आकाशाला टेकतात. विमानं आहेत जी आकाशात उडतात. आणि मुख्य म्हणजे मुंबईला खूप मोठ्ठा समुद्र आहे. समुद्र म्हंजे खूप खूप पाणी. ह्या ऽ एवढ्या प्रचंड लाटा येतात. हे पाणी कधीच आटत नाही. त्यातनं मोठ्या मोठ्या बोटी जातात... इ.

कौसल्या अचंब्यानं ऐकत राहिली.

'म्हंजे, मुंबईला पाण्याचा कधीच तोटा नसेल ना ग?' तिनं विचारलं. कारण महिषी गावात पाण्याचा फार तुटवडा होता. आधी विहिरीचं पाणी. उन्हाळ्यात विहिरी आटल्या की मैलन्-मैल पाणी आणण्यासाठी वाट तुडवावी लागे. घागरी, दोन घागरी पाणी मिळवणं हेच एक, दिवसाचं मोठं काम होऊन बसायचं. त्यामुळं खूप पाणी आहे, या गोष्टीची कौसल्येला अपूर्वाई वाटली. मुंबईचं बाकीचं वर्णन ऐकून कौसल्येला वाटलं, आपण ही

मुंबई पाहिलीच पाहिजे.

आणि मग हिरामणी गेली तरी कौसल्येच्या डोक्यातून मुंबई काही जाईना ! अखेर यात्रेला निघालेल्या काही माणसांच्या सोबतीनं कौसल्येनं आपलं गाव सोडलं, आणि ती मुंबईत आली. महालक्ष्मीच्या देवळाजवळच्या धर्मशाळेत उतरली. तिथून दिसणारा तो अफाट जलसागर तिनं पाहिला आणि ती धावतच खडकावर गेली. त्यावर बसून तिनं आपले पाय पाण्यात बुडवले. ओंजळीत पाणी घेऊन डोळ्यांना लावलं आणि तोंडात चूळ घेतली.

आणि लगेच थूथू करून टाकली. पाणी खारट होतं. तिला वाटलं, इथलं पाणी कशानं तरी खारट झालं असेल; म्हणून दूर जाऊन तिनं तिथलं पाणी तोंडात घातलं, तर तेही तसंच. शीऽ ऽ, हे काय ? आणखी एक माणूस तिच्या शेजारीच उभा राहून पाण्यात अर्घ्य देत होता. त्याला कौसल्या म्हणाली,

'ए बाबा, पाणी तोंडात घालू नको. लई खारं हाये.'

तो माणूस हसून म्हणाला, 'बाई, समुद्राचं पाणी खारटच असतं.'

'पर हिरामणी तसं काय बोलली न्हवती.'

'कोण हिरामणी ?'

'माझी गाववाली. समदीकडं पाणी असंच का ?' त्यावर त्या माणसानं मान हलवली आणि परत डोळे मिटले.

पण पाणी खरं असलं, तरी हिरवानिळा दिसणारा, नजरेच्या टप्प्यापर्यंत दूरवर पसरलेला तो समुद्र कौसल्येला फार आवडला. सकाळी वाजणाऱ्या देवळातल्या घंटा, आणि संध्याकाळी समुद्रात बुडणारा सूर्य पाहात ती तासन् तास खडकावर बसायची.

आणि मग बरोबरीची माणसं पुढे पुरीच्या यात्रेला निघून गेली, तरी कौसल्या मुंबईतच राहिली. देवळात दर्शनाला येणाऱ्या

माणसांच्या चपला, जोडे संभाळून चार पैसे पोटापुरते मिळवावेत, आणि समुद्राचं दर्शन घेत धर्मशाळेत राहावं; असे तिचे दिवस मजेत चालले होते.

रोजच्यासारखीच कौसल्या एक दिवस भल्या पहाटे उठली, आणि धुणं धुण्यासाठी किनाऱ्यावर गेली. त्या वेळी ओहोटी होती, त्यामुळे कौसल्या सहज आत दूरवरच्या खडकापर्यंत गेली. खडकावर बसून तिनं धुणी धुवायला सुरुवात केली. धुता धुता ती स्वतःशीच गाणं म्हणत होती. तिचं आवडतं लहानपणचं गाणं... झाडाला बांधलेल्या झोपाळ्यावर बसून म्हटलेलं.

गाणं म्हणण्यात, आणि ते म्हणता म्हणता आपल्या लहानपणच्या आठवणींत, कौसल्या इतकी रमून गेली, की ओहोटी संपून समुद्राला भरती सुरू झाली आहे, हे तिच्या लक्षातच आलं नाही. बघता बघता सभोवती उसळणाऱ्या लाटांनी खडकाला पार वेढून टाकले, आणि एखाद्या बेटावर अडकून पडावं तशी कौसल्या त्या खडकावर अडकून पडली. पायाला पाणी लागलं तेव्हा कौसल्या भानावर आली, आणि पाहते तो काय, सगळा खडक पाण्यात बुडालेला! ती तटकन उठून उभी राहिली. इकडे-तिकडे पाहू लागली. परतीची वाट पाण्याखाली गेली होती. क्षणाक्षणाला लाटा आणखी उसळत होत्या. खडकाला धडका देत होत्या. आता काय करायचं? जीव मुठीत धरून कौसल्या उभी राहिली. तिला पोहता येत नव्हतं, त्यामुळे पाण्यात उतरणं शक्य नव्हतं, आणि खडक केव्हा पाण्याखाली जाईल ते सांगता येत नव्हतं. आसपास कुणीही नव्हतं.

कौसल्या जिवाच्या आकांतानं हाका मारीत राहिली, 'वाचवा! मला वाचवा...धावा... '



सकाळी सकाळी देवीच्या दर्शनाला गेलेल्या एका भल्यानं प्रदक्षिणा घालताना तिचा आवाज ऐकला. तो धावला.

खडकावर कुणी तरी अडकलंय, ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. हे अद्भुत जीवननाटय पाहायला किनाऱ्यावर बघ्यांची

एकच गर्दी झाली. पण सगळे नुसतेच बघणारे ! जीव धोक्यात घालून तिला वाचवणार कोण ? त्यातच भर म्हणून पाऊस सुरू झाला. लाटांचा जोर आणखी वाढला, आणि कौसल्येच्या किंकाळ्याही.

अखेर लाड नावाच्या एका मुलानं, आपल्या दोन दोस्तांसह समुद्रात उडी घेतली. टायरची हवा भरलेली एक ट्यूब त्यांनी बरोबर घेतली, आणि लाटांशीं झुंज देत ते त्या खडकापर्यंत पोचले.

कौसल्येनं त्याला मिठीच घातली.

'बाई, मला धरशील तर दोघंही मरू. ही ट्यूब कमरेला बांध,' असं म्हणून लाडनं तिच्या कमरेला ट्यूब बांधली आणि तिला काठावर आणण्याचा ते प्रयत्न करू लागले. पण थोडं अंतर जाताच एक जबरदस्त लाट अशी आली, की कौसल्या त्या ट्यूब-मधून सुटली आणि वाहात जायला लागली. तेव्हा लाड आणि त्याच्या सहकाऱ्यांनी तिला पुन्हा खडकावर नेऊन ठेवलं आणि काय करावं याचा ते विचार करू लागले.

पण तोवर इकडे किनाऱ्यावरच्या एका जागरूक नागरिकानं अग्निशामकदलाला वर्दी दिली होती. खणखणत बंबवाले तिथं हजर झाले, आणि सोनू परब या बंबवाल्यानं एक तराफा घेऊन खडकाकडे झेप घेतली. तिघांनी कौसल्येला तराफ्याला नीट बांधले आणि मग तो तराफा ओढत किनाऱ्यावर आणला.

कौसल्या सुखरूप किनाऱ्यावर आली. आपले प्राण वाचले याचा तिला आनंद झाला, पण या गडबडीत आपले कपडे मात्र समुद्रात वाहून गेले, याचं तिला फार वाईट वाटलं.

आहे का नाही मनुष्यस्वभाव !

★

५

* * * * * * * * *

## अग्निदिव्य

'आई, बाबा केव्हा येणार ?'

सकाळपासून दहाव्यांदा समीरनं हा प्रश्न विचारला, तशी आई त्रासून म्हणाली, 'अरे, किती वेळा विचारशील ? एकदा सांगितलं ना, की दहा वाजता गाडी येते म्हणून ? पुन्हा विचारू नकोस. अभ्यास झाला का सगळा ? जा, कर जा.'

आई रागावली म्हणून समीरनं पुन्हा पुस्तक हातात घेतलं; पण आज त्याचं अभ्यासात मुळीच लक्ष लागत नव्हतं. डोळे बाबांच्या वाटेकडे लागले होते. कान टांग्याच्या आवाजाचा वेध घेत होते.

समीर बाबांची इतकी वाट पाहत होता त्याला कारण तसंच होतं. समीरचे बाबा रामदुर्गला शेताच्या कामासाठी गेले होते. समीरच्या मनात बाबांबरोबर जायचं होतं; पण परीक्षा, अभ्यास

या सबबींवर आईनं पाठवलं नाही. अभ्यासापेक्षासुद्धा आईला खेडेगाव मुळीच आवडत नाही. त्यामुळे ती स्वत:पण जात नाही, आणि समीरलाही कधी जाऊ देत नाही. तिथली ती मातीची घरं, धूळ, शेणाचा वास, अशिक्षित, अस्वच्छ, घाणेरडी माणसं, या सगळ्यांपासून समीरला दूर ठेवायचा ती नेहमी प्रयत्न करते. आईला आवडत नाही म्हणून बाबांनीही समीरला नेण्याचा आग्रह धरला नाही. पण बाबा नसले, की समीरला खूप कंटाळा येतो, एकटं वाटतं. कारण घरात आईशिवाय आणखी कुणीच नाही मग. आणि आई सारखी आपल्या कामात, नाही तर क्लबात !

समीर फार नाराज झाला. बाबांनी त्याच्यासाठी गंमत आणायचं कबूल केलं. आईनं कुत्सितपणे विचारलं,

'हं, त्या घाणेरड्या गावातनं काय आणणार तुम्ही ? माती, दगड, का शेणाचे गोळे ?'

शेतीचा वाटा मिळायचा होता, म्हणूनच आईनं बाबांना जाऊ तरी दिलं होतं. ठरलेल्या दिवसांपेक्षा बाबांना आणखी चार दिवस राहावं लागलं, म्हणून बाबांनी पत्र लिहिलं. आणि त्या पत्रातही बाबांनी समीरला लिहिलं होतं, की 'तुझ्यासाठी खास गंमत आणणार आहे. खूष होशील.'

म्हणून तर समीर बाबांची उत्सुकतेनं वाट पाहत होता. काय बरं आणतील बाबा ? क्रिकेटचा नवा सेट ? का कॅरमबोर्ड ? समीरनं पुन्हा उठून आईला विचारलं,' आई, बाबा काय आणणार आहेत ?'

'अरे, त्या खेड्यातनं काय आणणार ? एखादं डुकराचं पिल्लू नाही तर म्हशीचं रेडकू ! पण कोल्हापुरावरनं आले ना, तर मावशीनं तुझ्यासाठी घेऊन ठेवलेला बुशशर्ट आणतील. तू

आंघोळीला जा बरं आता.' आईनं सांगितलं.

घड्याळात दहाचे ठोके पडलेले ऐकले, तसा समीर टुणकन् उठला आणि व्हरांड्यात येऊन उभा राहिला, बाबांची वाट पाहात.

पण दहाचे अकरा झाले, तरी समीरचे बाबा आले नाहीत. आता आईला पण काळजी वाटायला लागली. तिच्याही आत-बाहेर खेपा सुरू झाल्या.

बारा वाजले तरी बाबांचा पत्ता नाही. मग आई म्हणाली,

'समीर, तू जेवून घे बघू आता. आज काही येत नाहीत ते.'

समीर नाइलाजानं पानावर बसला. त्यानं पहिला घास तोंडात घातला, तोच दाराशी टांगा थांबल्याचा आवाज आला. त्याबरोबर समीर तसाच बाहेर धावला.

टांगा खरंच दारासमोर उभा होता, आणि बाबा टांग्यातून उतरून टांगेवाल्याला पैसे देत होते.

'बाऽऽबा !' समीरनं धावत जाऊन त्यांच्या कमरेला विळखा घातला. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत बाबांनी सामान मथी मोलकरणीच्या हाती दिलं आणि म्हणाले,

'भैरू, अरे उतर ना.'

आत्ता कुठं समीरचं लक्ष टांग्याकडे गेलं. टांगेवाल्याशेजारी एक मुलगा बसला होता. बाबांनी त्याला उतरवून घेतलं. एका बाजूला समीर आणि दुसऱ्या हाताने भैरूला धरून आत येता येता ते म्हणाले,

'समीर, मी तुला म्हटलं होतं ना, की तुझ्यासाठी मोठ्ठी गंमत आणीन म्हणून ? हा बघ भैरू. तू या घरात एकटा असतोस, तुझ्याशी खेळायला कुणी नाही, म्हणून सारखा कुरकुरत असतोस ना, म्हणून तुला सवंगडी आणला आहे. तुझ्याबरोबर तो शाळेत

जाईल, तुझ्या खोलीत झोपेल, अभ्यास करील. चालेल ना? चल भैरू, हातपाय धुवून ये स्वच्छ. समीर, त्याला बाथरूम दाखव.'

'शी ऽऽ–' समीर एकदम म्हणाला. त्याला भैरू मुळीच आवडला नाही. त्याचं काळं, रापलेलं शरीर, अंगावरचे मळके फाटके कपडे, घामट वास, शेंबडानं भरलेलं नाक, तेल न लावल्यानं भुरभुरे झालेले केस– हे सगळं पाहून त्याला किळस आली.

आणि हा मुलगा बाबांनी आपल्याला सवंगडी म्हणून आणलाय! असल्या घाणेरड्या मुलाबरोबर राह्यचं... खेळायचं? छी! हीच का गंमत? समीरनं तोंड वाकडं केलं.

तेवढ्यात आई आतून आली. भैरूला पाहून तिनंही कपाळाला आठ्या घालीत विचारलं,

'ही कोण पिडा आणलीत आणखी?'

'अगं, हा आपल्या बयाक्काचा भैरू. मी तुला सांगितलं नव्हतं का, की लहानपणी बयाक्कानं मला अंगाखांद्यावर खेळवून, दूध पाजून मोठं केलंय, त्या म्हातारीचा हा नातू. पोराला आई नाही. बापानं दुसरं लग्न केलं. तेव्हापासून बयाक्कानं त्याला आपल्याकडे आणून वाढवला. पण परवा एका माजलेल्या बैलानं तिला शिंगावर घेऊन आदळली. म्हातारी जागच्या जागीच गेली. भैरू पुन्हा पोरका झाला, उघड्यावर पडला म्हणून मी घेऊन आलो. बयाक्कानं लहानपणी माझ्या खस्ता खाल्ल्या, त्याचं थोडं तरी ऋण फेडावं म्हणून याला जवळ केला. मुलगा गरीब आहे. राहील आपल्याजवळ. शिकून मार्गाला लागेल.' एवढं बोलून बाबा कपडे बदलायला निघून गेले.

भैरूचं आगमन समीरच्या आईला मुळीच आवडलं नाही.

तिनं रागावून, आदळ-आपट करून पाहिली; पण बाबांनी तिला दाद दिली नाही. भैरू इथंच राहणार, असं त्यांनी निक्षून सांगितलं.

मग संध्याकाळी बाबांनी भैरूला बाजारात नेऊन नवे चांगले कपडे घेतले. समीरच्या शाळेत जाऊन, हेडमास्तरांना सांगून, त्याची शाळेत बसण्याची व्यवस्था केली. त्याच्यासाठी वह्या, पुस्तकं, दप्तर घेतलं.

समीर हे सगळं बघत होता. एका काळुंद्र्या मुलासाठी बाबांनी इतकं सगळं करावं याचा त्याला रागही आला; आणि भैरूला त्याच्याच खोलीत अभ्यासाला पाठवलं तेव्हा तर तो फारच रागावला आणि त्यानं भैरूला खोलीबाहेर काढलं.

बिचारा भैरू ! आधीच आईवाचून पोरका, त्यात माया करणारी आजी पण निघून गेली; आणि आपलं गाव, ओळखीची माणसं– सगळं सोडून तो एका अनोळखी जगात येऊन पडला. तो अगदी भांबावून गेला. त्याला काय करावं कळेना. आपलं येणं ह्या घरात बाबांशिवाय कुणालाच आवडलेलं नाही हे त्यानं ओळखलं. पण तो तरी काय करणार ? कुठे जाणार ?

समीरनं हाकलल्यावर त्यानं बाहेरच्या व्हरांड्यात आपली पथारी पसरली, आणि तिथंच आपली ट्रंक ठेवली. बाबांनी ते पाहून त्याला विचारलं, तशी तो म्हणाला,

'साहेब, मला वाऱ्यावर, उघड्यावर झोपायची सवय हाय. इथंच ब्येस वाटतं.'

दुसऱ्या दिवशी 'भैरूला शाळेत बरोबर घेऊन जा आणि त्याच्या वर्गात बसव.' असं बाबांनी सांगितल्यामुळं नाइलाजानं समीरला त्याला बरोबर घ्यावं लागलं. पण समीरला त्याच्याबरोबर चालायची लाज वाटली. असला गावंढळ मुलगा बरोबर पाहून

मित्र टिंगल करतील अशी त्याला भीती वाटली, आणि म्हणूनच घराबाहेर पडल्याबरोबर त्यानं भैरूला बजावलं,

'हे बघ, माझ्यापासून बारा फूट अंतरावरनं चाल. खबरदार माझ्याबरोबर सलगी केलीस तर. आणि माझं दप्तर घे.' असं म्हणून समीरनं आपलं दप्तर त्याच्या हातात दिलं.

वाटेत भेटलेल्या मित्रांना 'तो आपला गडी आहे' असंच समीरनं सांगितलं. आणि शाळेत गेल्यावर खुणेनंच त्याला त्याचा वर्ग दाखवून समीर पटकन आपल्या वर्गात शिरला.

प्रथम नव्या वातावरणात भैरू बुजला, तरी हळूहळू तो रुळला. भैरू बुद्धीनं चांगला होता, त्यामुळं तो वर्गात पहिला आला. तब्येतीनं दणकट असल्यानं धावण्यात, लंगडीच्या शर्यतीतही त्यानं बक्षिसं मिळवली; आणि भैरू शाळेत सगळ्यांचा आवडता झाला!

जो जो भैरू सगळ्यात पुढे येऊ लागला, तो तो समीर त्याचा आणखीनच द्वेष करू लागला. बाबांना मात्र आपण त्याला इथं आणलं आणि त्याच्या अंगच्या गुणांचं चीज केलं, म्हणून आनंद झाला होता. आणि समीरनं, त्याच्या आईनं रागराग केला, तरी भैरू मात्र त्यांच्याशी नेहमीच प्रेमानं आणि आदरानं वागायचा. आईला घरकामात मदत करायचा. समीरची खोली स्वच्छ ठेवायचा, त्याचे कपडे इस्त्री करायचा, त्याचे बूट पॉलिश करायचा; पण समीरचं तोंड वाकडं ते वाकडंच. भैरूचा अपमान करायची तो संधीच शोधत असायचा.

परीक्षा झाली आणि शाळेला सुट्टी पडली. भैरूला पेपर चांगले गेले होते. नंबराची खात्री होती. सुट्टीत भैरू चार दिवस गावाकडे

जाणार होता. भैरू दुसऱ्या दिवशी सकाळीच जायचा होता. त्याला आणि समीरला घरात ठेवून आई आणि बाबा रात्रीच्या सिनेमाला गेले होते. समीर आपल्या खोलीत अंथरुणावर पडून कंदिलाच्या उजेडात गोष्टीचं पुस्तक वाचत होता, आणि भैरू व्हरांड्यात आपल्या पथारीवर गावाची स्वप्नं पाहात झोपी गेला होता.

वाचता वाचताच केव्हा तरी समीरलाही झोप लागली. उशागती कंदील तसाच ढणढणत होता. तो उचलून बारीक करून दूर ठेवायला समीर विसरला. झोपेतच केव्हा तरी समीरच्या हाताचा धक्का त्या कंदिलाला लागला, आणि कंदील कलंडला आणि भडकला. कंदील आडवा झाल्याबरोबर त्यातलं तेल सगळीकडे पसरलं आणि त्यानं पेट घेतला. बघता बघता आग सगळीकडे पसरली आणि समीरच्या मच्छरदाणीनंही पेट घेतला. आगीची झळ लागली तसा समीर झोपेतून जागा झाला. बघतो तर सगळीकडे ज्वाळा. प्रथम त्याला वाटलं, आपण स्वप्नच बघतोय; पण मग आगीचे चटके बसायला लागले तेव्हा तो घाबरला. गादीतनं उठून बाहेर आला. पण बघतो तर सगळी खोली धुरानं आणि आगीनं भरलेली.

विलक्षण भयभीत होऊन समीर जोरजोरानं किंकाळ्या मारू लागला, 'वाचवा– मला वाचवा !' खिडकीतून धुराचे लोटच्या लोट बाहेर यायला लागले. आग खोल्याखोल्यांतनं पसरायला लागली. आणि समीरच्या किंकाळ्या वाढायला लागल्या. धूर आणि आग पाहून रस्त्यावर लोकांची गर्दी जमा झाली.

गाढ झोपलेला भैरू कसल्याशा आवाजानं जागा झाला. पाहतो तर रस्त्यावर गर्दी. काय झालं म्हणून बघायला भैरूही व्हरांड्यातनं रस्त्यावर आला. पाहतो तर आपल्याच घराला आग

लागलेली. तीही समीरच्या खोलीकडच्या बाजूलाच पसरलेली.

'समीर, समीर कुठाय ?' भैरू मनाशी म्हणत होता; तोच भडकलेल्या ज्वाळेमधून समीरची किंकाळी ऐकू आली. अरे देवा! म्हणजे समीर आतच अडकला आहे? भैरू घरात धावला. पण दिवाणखान्यात जातो की नाही, तोच गपकन् धूर त्याच्या नाका-घशात गेला.

घाबरून भैरू दोन पावलं मागे हटला. असंच बाहेर पळावं असंही त्याला वाटलं. पण मग समीर? समीर संकटात सापडला असताना आपण रस्त्यावरच्या बघ्यांच्या गर्दीत नुसतं जाऊन उभं राहायचं? बाबासाहेब समीरला आपल्यावर सोपवून गेले आहेत; ते काय म्हणतील? नाही, नाही, आपल्याला आत गेलंच पाहिजे. समीरला वाचवलंच पाहिजे.

भैरू पुन्हा माघारी फिरला; पण आत कसं जायचं ते त्याला कळेना. सगळी खोली धुरानं गच्च भरली होती. मग भैरू गुढग्या-वर रांगत आत शिरला, आणि दिवाणखान्याला लागून असलेल्या जिन्यापर्यंत आला. जिना लाकडी होता आणि जिन्याच्या वरच्या पायऱ्यांनी पेट घेतला होता. भैरू तसाच जिना चढला, आणि त्यानं त्या पेटत्या पायऱ्यांवरून एकदम आत झेप घेतली!

तो समीरच्या खोलीकडे धावला. ती सगळी खोली लाल-पिवळ्या ज्वाळांनी वेढली होती. 'समीर, समीर' भैरूनं हाका दिल्या; पण समीरनं त्याला प्रतिसाद दिला नाही.

'म्हणजे, समीर त्या ज्वाळांत तर सापडला नाही?' पण त्या ज्वाळांतून आत शिरणं आणि शोध घेणं अशक्य होतं. निराश होऊन भैरू बाबांच्या खोलीकडे वळला. धूर घशात जाऊन जीव कासावीस होत होता. डोळे उघडवत नव्हते, इतके चुरचुरत होते.

भैरू चाचपडत चालला, तोच त्याला वाटेत समीर बेशुद्ध होऊन पडलेला दिसला.

'समीर, समीर–' भैरूनं हाका मारल्या; पण तो शुद्धीवरच नव्हता तर ओ कशी देणार ?

मग भैरूनं उचलून त्याला पाठीवर टाकलं आणि तो जिन्याकडे वळला. आता जिन्याने जास्तच पेट घेतला होता. पण त्यातूनच भैरूने समीरला घेऊन एकदम उडी मारली ती पाचव्या पायरी-वर. आधाराला त्याने कठडा धरला, तोच तो कडाड् आवाज करीत मोडून पडला. तरीही भैरूने स्वतःला सावरले आणि तो धुरातून वाट काढीत पुढे चालला.



इकडे आग लागल्याची खबर कुणी तरी आगीच्या बंबाला दिली. बंब खणखणत आला. तो वाटेतच सिनेमा पाहून परत येत

असलेल्या आई-बाबांना दिसला. पण आपलंच घर पेटलंय याची त्यांना कोपऱ्यावर येईपर्यंत कल्पना नव्हती. पण आपल्याच घरातून ज्वाळा येत असलेल्या पाहून दोघंही घाबरली व धावत सुटली.

त्यातच समीर आत राहिल्याचं आणि त्याच्या किंकाळ्या ऐकू आल्याचं कुणी तरी सांगितलं, तेव्हा तर समीरच्या आईनं मोठ्यांदा टाहो फोडला. ‘ समीर, बाळ– माझ्या बाळाला वाचवा हो ऽऽ.’

‘ भैरू कुठं आहे ?’ बाबांना भैरूचीही आठवण झाली.

त्यालाही कुणीच पाहिलं नव्हतं.

‘ अरे देवा, म्हणजे दोन्ही पोरं आत अडकलीत की काय ?’ बाबा आत जायला निघाले; पण लोकांनी त्यांना आडवलं.

‘ असल्या आगीत उडी घेऊ नका, बाबासाहेब. बंबवाले आले आता.’ लोकांनी समजूत घातली.

बाबा डोळ्यांत प्राण आणून त्या जळत्या घराकडे पाहत होते. पाहता पाहता त्या आगीतून, धुरातून भेलकांडत एक आकृती पुढे येताना दिसली.

तो भैरू होता, आणि त्याच्या पाठीवर समीर. बाबासाहेबांच्या पायाशी समीरला आणून ठेवला आणि भैरू तिथंच कोसळला. त्याचं सगळं अंग होरपळलं होतं, पण त्यानं समीरला वाचवलं होतं.

‘भैरू– ’ बाबांनी त्याला मिठीत घेतला. ‘ तू माझ्या बाळाला वाचवलंस भैरू. तुझे उपकार कसे फेडू ?’

समीर आणि भैरू दोघंही हॉस्पिटलमध्ये एकाच खोलीत होते. पण आता समीरला भैरूचा राग येत नव्हता, तर त्यानं केलेल्या अग्निदिव्यामुळं तो त्याचा खराखुरा सवंगडी झाला होता.

★

६

*  *  *  *  *  *  *  *  *

## दुर्गादेवीचा पराक्रम

देवीच्या उत्सवाचा शेवटचा दिवस होता. निळ्याभोर मोरावर बसलेली देवीची मूर्ती दागिन्यांनी मढली होती. डोक्यावर सोन्याचा मुकुट होता, गळ्यात हिऱ्याचा कंठा, हातात मोत्यांच्या बांगड्या, अंगावर भरजरी शालू. देवीचं रूप मोठं सुरेख दिसत होतं.

दर्शनासाठी लोकांची रीघ लागली होती. वर्षातून एकदाच या उत्सवाच्या वेळी देवीचे सगळे दागिने बाहेर काढून तिच्या अंगावर घातले जात. देवीची पालखी निघे. याच वेळी देवी जागी असते, नवसाला पावते, असा लोकांचा विश्वास असल्याने नवस बोलायला येणारे, आणि केलेला नवस फेडायला येणारे यांची एकच गर्दी होई ! आसपासच्या खेड्यांतून भाविक पायी अगर बैलगाडीने येत. मोठी जत्रा भरे. देवळाच्या आवारात पेढेबत्ताशांची दुकाने लागत. फुगे, पिपाण्या, बांगड्या विकणारे लोकही इथे मुक्काम

ठोकून असत. पोरांनी वाजवलेल्या पिपाण्यांच्या आवाजानं ते आवार दुमदुमून जाई. नव्या ठेवणीतल्या साड्या नेसून बाया-बापड्या दर्शनाला येत.

अंधार पडायला लागला, तशी मांडलेली दुकानं आवरून दुकानदार परतीच्या मार्गाला लागले. दर्शनाला येणाऱ्या माणसांची गर्दी संपली. शेजारती झाली, आणि देवी झोपली. देवीच्या अंगा-वरचे सगळे दागिने उतरवून घेऊन पुजारीबुवांनी घरातल्या तिजोरीत नेऊन ठेवले, आणि देवीच्या गाभाऱ्याच्या जाळीच्या दाराला कुलूप घालून ते घरात गेले.

जेवणंखाणं झाली आणि मंडळी झोपेच्या आधीन झाली. दिवसभराच्या दमणुकीनं सगळ्यांनाच गाढ झोप लागली.

दुर्गादेवीलासुद्धा ! दुर्गादेवी ही पुजारीबुवांची मुलगी. चौदा-पंधरा वर्षांची असेल. चौथीपर्यंत शिक्षण झालं, आणि पुजारी-बुवांनी दुर्गाची शाळा बंद केली. त्या काळी मुलींना फार शिकवत नसत. मग दुर्गा घरात राहून, देवळाची झाडलोट करणं, देवीच्या पूजेची तयारी करणं, स्वयंपाकात आईला मदत करणं, ही कामं करायची, आणि कामं संपली, की नदीत तासन्तास डुंबायची किंवा आमराईत हिंडायची. मैत्रिणी जमवून झाडावर सुरपारंब्या खेळायची. मोकळ्या हवेत राहून, भरपूर व्यायाम करून दु र्गाची तब्येत छानच झाली होती ! मुलीच्या जातीनं असू नये इतकी दणकट झाली होती ! गावातली लोकं नावं ठेवत. 'असल्या दणकट मुलीला नवरा कुठून मिळणार' असं म्हणत. दुर्गाची आईही तिला रागावे. पण पुजारीबुवांची मात्र ती फार लाडकी होती. आणि आपल्या मुलीला चांगला नवरा मिळेल, नव्हे, आपणहून मागणी घालील, अशी त्यांना खात्री वाटत होती.

उत्सवाच्या दिवसांत देवीच्या दागिन्यांवर लक्ष ठेवण्याचं काम तिच्याकडे होतं. रोज रात्री दागिने काढून ठेवायचे, आणि सकाळी देवीची आंघोळ झाली की घालायचे. दुर्गीला कुठं बाहेर जायला मिळायचं नाही त्यामुळे. उत्सव संपला, तेव्हा आता उद्यापासून नदीत डुंबायला आपण मोकळ्या झालो; या आनंदातच दुर्गी झोपली होती.

मध्यरात्रीचा सुमार झाला आणि पुजारीबुवांच्या घरावर दगड पडायला सुरुवात झाली.

त्या आवाजानं पुजारीबुवा जागे झाले. पत्र्यावर होणारा दगडांचा आवाज कसला आहे हे त्यांच्या लक्षात आलं आणि त्यांच्या छातीत धस्स झालं! दरोडेखोर आले हे त्यांनी ओळखलं.

कारण ज्या घरावर दरोडा घालायचा असेल त्या घरावर दगडांचा मारा दरोडेखोर करीत. आजूबाजूच्या लोकांना कळावं हा त्यात हेतू असे. त्याप्रमाणे गावातल्या लोकांनी तो आवाज ऐकला; पण एकही माणूस उठून घराबाहेर आला नाही. कारण जो कोणी बाहेर येईल, तो दरोडेखोरांच्या बंदुकीला बळी पडणार, अगर कुऱ्हाडीनं मारला जाणार हे नक्की! त्यामुळं प्रत्येकजण आपल्या पांघरुणात घुसमटून पडून राहिला.

देवीचे दागिने आज पुजाऱ्याच्या घरात आहेत, ही बातमी दरोडेखोरांना कळली होती. उत्सवाच्या दिवसांत दरोडेखोरांचे साथीदार देवीच्या दर्शनाच्या निमित्तानं येऊन टेहळणी करून गेलेच होते. देवीच्या अंगावरचे ते झगमगते दागिने पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलं नसतं तरच नवल! पण देवीच्या अंगावरचे दागिने ओरबाडण्याची त्यांना नाही म्हटलं तरी भीती वाटली असावी. देवीचा कोप झाला तर? म्हणून त्यांनी शेवटचा दिवस

नक्की केला, आणि कसा हल्ला करायचा याचा बेत आखला.

पत्र्यावर दगड टाकून लोकांना घाबरवून टाकणं ही पहिली चाल होती. थोडा वेळ दगड टाकून झाल्यावर त्यांनी कानोसा घेतला. एकही माणूस बाहेर तर आला नाहीच, पण कुणाच्या घरात उजेडही दिसला नाही. सगळ्यांनी लावलेले दिवेही विझवून टाकले होते. न जाणो, उजेड दिसला आणि दरोडेखोरांची टोळी इकडे वळली तर ?

लोकांना असं घाबरवून टाकल्यानंतर दरोडेखोरांनी आपलं लक्ष देवळाकडे केंद्रित केलं. हातांतल्या कुऱ्हाडी पारजीत दरोडेखोर पुढे सरकले. देवळाच्या ओसरीतच सत्तर वर्षांचा चुन्ना झोपला होता.

अंधारात पुढे सरकणाऱ्या काळचाकभिन्न आकृत्या कुणाच्या आहेत हे त्यानं ओळखलं. त्याच्यानं राहवलं नाही. देवीचा विध्वंस हे लोक करतील या भयानं तो पुढे झाला, आणि त्यानं दरोडेखोरांना रोखलं.

'ए, बाजू हट !' एकानं दरडावलं.

'नाही. चांडाळांनो, देवीच्या अंगाला स्पर्श करण्याची तुमची लायकी नाही. दूर व्हा.'

'अरे वा ! आमची लायकी काढतोस काय रे म्हाताऱ्या? ही बघ तुजी लायकी–' असं म्हणत दुसऱ्या दरोडेखोरानं आपली कुऱ्हाड त्याच्या मानेवर सपकन चालवली.

एक किंकाळी हवेत विरली. शिर धडावेगळं झालं.

पुजारीबुवा थरथरत उठले. त्यांनी बायकोला उठवलं. तिला कणगीमागे लपवलं. गाढ झोपलेल्या दुर्गाला उठवलं. 'कार्टे, लप कुठं तरी–' असं म्हणत त्यांनी तिला घडवंचीवर गाद्यांच्या

ढिगाऱ्यावर बसवलं. काय चाललंय, काय घडलंय हे दुर्गाच्या लक्षातच आलं नाही. सगळचात वरच्या गादीवर मुटकुळं करून ती परत झोपून गेली.

बाहेरच्या दरवाज्यावर धडाधड धडके बसायला लागले. थोड्याच वेळात दरवाजा तोडून तोंडाला काळं फडकं बांधलेले, हातात हत्यारं घेतलेले दरोडेखोर आत घुसले.

पुजारीबुवा जागच्याजागीच खिळून उभे राहिले.

'ए पुजाऱ्या, देवीचे दागिने कुठायत ?' एकानं विचारलं.

काहीच उत्तर आलं नाही, तेव्हा बंदूकवाल्या दरोडेखोरानं आपली बंदूक त्याच्यावर रोखली.

'ए, सांगतुस का न्हाई ? दागिने कुठं हायीत ? गुमान दाखीव.'

'म...म... मला माहीत नाही.'

'आस्सं ! मरायचं हाये ? ही बंदूक ठासून भरलीया. एक गोळी सुटली तर–' असं म्हणत त्या दरोडेखोरानं बंदुकीची नळी वर करून चाप ओढला. ठोऽऽ आवाज करीत वरचे पत्रे फोडून गोळी निघून गेली.

आधीच्या आवाजानं दुर्गाची झोप चाळवली गेलीच होती. बंदुकीच्या आवाजानं ती पुरती जागी झाली. हळूच पालथं वळून तिनं पाहिलं, तर दोन दरोडेखोर आपल्या बापाला तंबी देतायत ! त्या दोघांचीही दुर्गा ज्या घडवंचीवर होती तिकडे पाठ होती. ते सारखे पुजाऱ्याला छेडत होते.

'चल, चावी दे लवकर. कुठं हाय तिजोरी ती बी दाव. चल.' पुन्हा बंदूक त्याच्या छातीला लावत तो गरजला.

'आटप लवकर' म्हणत दुसऱ्यानं कुऱ्हाडीचं टोक त्याच्या मानेवर टेकलं. बिचारा पुजारी गर्भगळित झाला.

त्यातच घडवंचीवर उठून बसलेली दुर्गा त्यानं पाहिली. त्या-बरोबर तो आणखी घाबरला. ह्या चांडाळांनी पोरीला पाहिली, तर तिचीही खांडोळी करून टाकतील. त्यापेक्षा दागिने देऊन टाकावेत ते बरं, ह्या विचारानं पुजाऱ्यानं म्हटलं,

' दाखवतो, या. ' आणि तो पाठमोरा झाला. त्याच्या पाठीला बंदूक टेकून चाललेला दरोडेखोर घडवंचीजवळ आला. त्याबरोबर दुर्गानं वरनं उडी घेतली ती त्याच्या अंगावरच !

अनपेक्षितपणे झालेल्या ह्या हल्ल्यानं दरोडेखोर दचकला. दुर्गानं मागनं त्याच्या मानेला मिठी घातली आणि त्याला खेचला. त्याबरोबर तो खाली पडला. धक्क्यानं बंदूक हातातून उडून दुसरीकडे पडली. दुर्गा ती बंदूक हस्तगत करायला पुढे आली, तोच दुसऱ्या दरोडेखोरानं तिच्यावर चाल केली. पण ही पंधरा-सोळा वर्षांची पोर घाबरली नाही. तिनं जणू रणचंडीचा अवतार धारण केला. समोरून येणाऱ्या दरोडेखोराच्या पोटात तिनं अशी मुसंडी मारली की तो भिंतीवर फेकला गेला. कुऱ्हाड उडून दूर पडली. तोवर पहिला दरोडेखोर सावरला होता. त्यानंही दुर्गावर चाल केली. दुर्गानं त्याच्याशी मुकाबला केला.

आपल्या पोरीचा हा पराक्रम पाहून पुजाऱ्यालाही आता बळ आलं. त्यानं एका दरोडेखोराला थोपवून धरलं. पहिल्याशी झुंज देता देता दुर्गानं शिताफीनं बंदूक हस्तगत केली, आणि त्या दोघांवर रोखत तिनं दरडावून सांगितलं,

' चांडाळांनो, देवीचे दागिने असे वाटेल त्याच्या हाती लागत नसतात. चालते व्हा, चालते व्हा इथून. नाहीतर या तुमच्या बंदुकीतल्या गोळ्या तुमचाच जीव घेतील. मलाही निशाणबाजी येते. बघायचीय ?' असं म्हणत तिनं एक गोळी उडवली. ती एका

दरोडेखोराच्या कानाला चाटून गेली. त्या बरोबर ते दोघेही मागे मागे सरकले व अंधारात नाहीसे झाले.

देवीवरचं, सगळ्या घरादारावरचं संकट टळलं. हा पराक्रम एक सोळा वर्षांच्या मुलीनं करून दाखवला !

पुजाऱ्यानं आपल्या मुलीला आनंदाश्रूंनी न्हाऊ घातलं. आईनं लेकीची दृष्ट काढली.

गावकऱ्यांनी दुर्गादेवीचं कौतुक केलं. सरकारनं बक्षीस दिलं. आणि दुर्गादेवीच्या या पराक्रमानं एक तरुण पोलिस इन्स्पेक्टर तर इतका खूष झाला, की त्यानं तिच्याशी लग्नच लावून टाकलं !

★

७

* * * * * * * * *

## उत्तर ध्रुवावर स्वारी

बर्फाच्या समुद्रातून वाट काढीत चाललेल्या बोटीवर रॉबर्ट पिअरी उभा होता. मागे बर्फ, पुढे बर्फ, सभोवार, नजर टाकावी तिकडे पांढरा शुभ्र बर्फच नजरेला पडत होता; आणि या रक्त गोठवणाऱ्या थंडीतून, हाडांची लाकडे करणाऱ्या बर्फातून पिअरी एका अज्ञाताच्या शोधाला निघाला होता. पिअरीला जगाच्या डोक्यावर, म्हणजे उत्तर ध्रुवावर उभे राहायचे होते. म्हणूनच तो निघाला होता उत्तर ध्रुवाच्या शोधासाठी. ' कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला. या शोधाची बरोबरी तोच करू शकेल, जो उत्तर ध्रुवावर आपले निशाण रोवेल. आणि हे निशाण मी– रॉबर्ट पिअरीच रोवेन–' १८९० साली पिअरीने मनाशी ही प्रतिज्ञा केली आणि त्या दिशेने पावले उचलली.

मनाशी ही असली धाडसी प्रतिज्ञा करणारा, आणि अनेक वेळा अपयश आले तरीही माघार न घेता, अखेर या अज्ञात ध्रुवावर

प्रथम पाऊल ठेवणाऱ्या रॉबर्ट पिअरीचा जन्म अमेरिकेत १८५६ च्या मे महिन्यात झाला. पिअरीला अगदी लहानपणापासूनच साहसाची आवड होती. समुद्राच्या पाण्यातच पिअरी लहानाचा मोठा झाला ! याशिवाय डोंगर चढणे, वेगवेगळे दगड जमवणे, वनस्पती गोळा करून त्यांचा अभ्यास करणे, कविता करणे आणि डायरी लिहिणे हे त्याचे छंद होते. या सगळ्याच छंदांचा पिअरीला पुढील आयुष्यात फार उपयोग झाला. याशिवाय पिअरी अभ्यासातही हुषार होता. १८७७ साली तो सिव्हिल इंजिनिअरची परीक्षा मोठ्या सन्मानाने पास झाला. पिअरीने व्यायामाने आपले शरीरही चांगले कमावले होते.

इसवी सन १८९५ ते १९०२ मध्ये रॉबर्ट पिअरीने उत्तर ध्रुवावर स्वारी करण्याचा प्रथम प्रयत्न केला; पण तो फसला. १९०५–१९०६ मध्ये पुन्हा एकदा त्याने आपल्या ध्येयाकडे झेप घेतली; पण याही वेळी यश दूरच राहिले. उत्तर ध्रुवावर रोवण्यासाठी पिअरीच्या बायकोने स्वतः शिवून निशाण तयार केले होते; पण ते रोवण्याचा योग आला नाही. पण पिअरी निराश झाला नाही. अमेरिकेत परत आल्यावर त्याने पुन्हा मोहिमेची जुळवाजुळव करायला सुरुवात केली, आणि वयाच्या बावन्नाव्या वर्षी तो पुन्हा मोहिमेवर निघाला.

या सबंध मोहिमांत पिअरीला प्रथमपासून साथ दिली, ती एका निग्रो मुलाने. त्याचे नाव मॅथ्यू हेन्सन. रॉबर्ट पिअरी एकदा खेळण्यांच्या दुकानात गेला होता. तिथे योगायोगानेच त्याला हेन्सन भेटला. हेन्सन तिथे नोकरी करीत होता. त्याचे सुदृढ शरीर पाहून पिअरीने त्याला विचारले,

'मी उत्तर ध्रुवाच्या बर्फाळ भागात मोहिमेवर जातो आहे;

येतोस का ?'

आणि हेन्सनने एका क्षणाचाही विलंब न लावता होकार दिला. उष्ण कटिबंधात वाढलेला हा निग्रो मुलगा बर्फाळ भागात शून्याखाली टेंपरेचरला कसा काय तग धरील, याची पिअरीला भीती वाटत होती. पण हेन्सनने त्या हवामानाशी तर जुळवून घेतलेच, पण हेन्सन एस्किमो लोकांचा अगदी जवळचा मित्र झाला. एस्किमो लोक तपकिरी रंगाचे असतात, आणि मॅथ्यू हेन्सनचा रंग काळा होता; त्यामुळे गोऱ्या रंगाच्या पिअरी आणि त्याच्या सहकाऱ्यांपेक्षा हेन्सन एस्किमोंना आपल्यातला वाटला. एस्किमोंची भाषा ही जगातली अवघड भाषा समजली जाते. हेन्सनने ही भाषा लवकरच आत्मसात केली. याशिवाय बर्फातून गाडी चालवणे, बर्फाची घरे बांधणे, कातड्यांचे कपडे शिवणे, अन्न शिजवणे, शिकार करणे, ह्या सगळ्या गोष्टींत हेन्सन इतका तरबेज झाला की, लवकरच तो पिअरीचा नोकर न राहता त्याचा सहकारी बनला. उत्तर ध्रुवाच्या शोधात पिअरीइतकाच मॅथ्यू हेन्सनचाही भाग महत्त्वाचा आहे.

उत्तर ध्रुवाच्या टोकापासून पाचशे मैलांच्या आसपास सगळे नुसते बर्फच आहे. एस्किमोंची वस्ती आहे ती त्याच्या अलिकडे. १९०५ साली पिअरीने अनेक अडचणींना, संकटांना तोंड देत ह्या बर्फाच्या सागरातून उत्तर ध्रुवापासून १७४ मैलांपर्यंतची मजल मारली होती. हाही खरे म्हणजे एक विक्रमच होता ! कारण उत्तर ध्रुवाच्या इतके जवळ अजून कुणी गेले नव्हते. पण तिथून पुढे मात्र त्याला जाता आले नाही. तरी देखील तो परत आला तेव्हा अमेरिकेने त्याचे वीरोचित स्वागत केले. पण लोकांना वाटले की, आता काही हा पुन्हा मोहिमेवर जात नाही. कारण आता पिअरीचे

शरीर थकले होते. वृद्धत्वाच्या खुणा शरीरावर उमटल्या होत्या. बर्फात चालून चालून पायांची बोटे तुटली होती. अशा पायांनी साधे चालणे देखील कठीण जाते; मग बर्फातून चालायचे म्हणजे– शिवाय डोळे अधू झाले होतेच.

पण पिअरीने जिद्द सोडली नाही. १९०८ साली आता शोध लावेन, किंवा तिथेच मरून जाईन, ह्या ईर्ष्येने तो रुझवेल्ट बोटीवर चढला, आणि आता तीच रुझवेल्ट बोट बर्फ कापीत चालली होती.

पिअरी ग्रीनलँडला आला, तेव्हा तिथल्या एस्किमोंनी हात उंचावून, आरोळ्या देऊन त्याचे हार्दिक स्वागत केले. कारण पिअरी यापूर्वी तिथे अनेकदा गेला असल्याने त्यांची आता चांगली दोस्ती झाली होती. बरोबर आणखी एस्किमो, कुत्रे, गाड्या, खाण्या-जेवण्याच्या, राहण्याच्या सामानाची सोय– अशी सगळी तयारी करून घेऊन 'रुझवेल्ट' पुन्हा बर्फ कापीत चालली. सप्टेंबर पाचला ते पोलार समुद्रापर्यंत आले. लांबच लांब पसरलेल्या काळ्याशार रात्री आणि गोठवणारी थंडी ! पण ह्या दिवसांत झोपून राहता येत नाही. उलट, ह्याच दिवसांत पुढच्या मोहिमेच्या तयारीसाठी त्यांना अतिशय मेहनत करावी लागली. विशेषत: कातड्याचे कपडे शिवताना तर इतकी काळजी घ्यावी लागते की, एखादे सुईएवढे भोक राहिले, तरी त्यातून घुसणारी थंडी शरीर गोठवायला पुरेशी असते.

नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी गेले. पिअरी आपल्या झोपडीत बसून पुन्हा पुन्हा नकाशा पाहात होता. आखलेला मार्ग तपासत होता. फेब्रुवारी २७ ला रात्री पिअरीने सगळ्या लोकांना शेवटच्या सूचना दिल्या.

दुसऱ्या दिवशी अखेरच्या मोहिमेवर निघायचे होते. ती रात्र

एस्किमोंनी नाचगाण्यांत, आनंदात घालवली. प्रत्येक इग्लूमधून हास्यविनोद झडत होते. त्याच वेळी रॉबर्ट पिअरी आपल्या झोपडीत निघण्याची तयारी करीत होता. पिअरीने आपल्या बायकोने शिवून दिलेले निशाण कमरेला गुंडाळले. प्रथम मोहिमेपासून त्याने ते जवळ बाळगले होते. आता ते ठिकठिकाणी फाटले होते, त्याला ठिगळे जोडली होती; पण पिअरी हेच निशाण रोवणार होता. तो योग यावेळी तरी येणार होता का ?

दुसरे दिवशी सकाळी मोहीम सुरू झाली. बावीस माणसे आणि एकोणीस कुत्री यांच्यावरून पिअरीने शेवटची नजर टाकली आणि चाबूक फटकावला. कुत्र्यांची गाडी बर्फावरून घसरत बर्फाच्याच समुद्राकडे निघाली. चारशे मैलांचा प्रवास करायचा होता.

दहा मैलांचा पहिला टप्पा आला, आणि पहिली अडचण उभी राहिली. बर्फावरून चालता चालता एके ठिकाणी बर्फ वितळून पाणी झाले होते. टणक बर्फावरून चालणे सोपे, पण ह्या पाण्यातून चालणे म्हणजे गोठून मरणेच. आता ह्या पाण्याचे बर्फ होईपर्यंत थांबणे भागच होते. पुन्हा बर्फ गोठेपर्यंत उत्तरेचा बर्फ एक मैल सरकला होता, आणि पिअरीने आखलेला मार्ग बदलून गेला होता. कशी तरी मंडळी मुक्कामावर पोचली. पण आता हवामान पुन्हा उणे पन्नास (–५०) वरून उणे नऊ (–९) वर आले होते. थंडी उबदार होण्यास त्याची मदत होणार होती, पण त्याचबरोबर ठिकठिकाणचे बर्फ वितळणार आणि मार्गात पाण्याचे अडथळे येणार, हे तितकेच मोठे संकट होते.

आणि झालेही तसेच. ‘ बिग लीड ’च्या रूपाने संकट उभे राहिले. तरंगता बर्फाचा कडा जवळ जवळ चारशे यार्ड मोठा

पसरलेला होता.

मंडळी तिथेच थांबली. दुसरा इलाजच नव्हता. एक दिवस गेला, दुसरा गेला .. बरोबरच्या एस्किमोंचे धैर्य गळायला लागले. इथूनच परतावे असे त्यांना वाटायला लागले. पण पिअरी निश्चयाने तिथेच तळ ठोकून बसला. अखेर ११ मार्चला टेंपरेचर पुन्हा −४० झाले, आणि ‘ बिग लीड ’ गोठले. पिअर आणि त्याचे सहकारी पुन्हा आगेकूच करू लागले.

पण आता नवीच अडचण उभी राहिली. पिअरीच्या सहकाऱ्या-पैकी एकाचा– मॅकमिलनचा– पाय गोठला. लाकूड झाला. त्याला परत पाठवणे भागच होते. त्यानंतर हे वरचेवर घडायला लागले. ब्राऊप गेला, मर्लिनला परत पाठवावे लागले.

पिअरी आणि हेन्सन मात्र चालतच राहिले. मैलांमागून मैल सरले, आणि अखेर बावीस वर्षे उराशी बाळगलेले ते स्वप्न जवळ येऊन ठेपले. आता फक्त पाच टप्प्यांत उत्तर ध्रुवाच्या टोकावर जाता आले असते. पाय थकले होते. अंगात त्राण नव्हते, पोटात भुकेचा डोंब उसळला होता, पण पिअरीने ठरवले, चालायचे. चालायची शक्ती आहे तोवर चालायचेच. वेळ आली तर रांगायचे, लोळत जायचे, पण अखेरपर्यंत जिद्द सोडायची नाही. ध्येयमंदिर इतक्या जवळ आले असताना माघार घ्यायची ? शक्यच नाही !

हेन्सन, पिअरी, आणि चार एस्किमो चालत राहिले. दहा तासांत त्यांनी तीस मैलांचे अंतर कापले. थोडा वेळ विश्रांती घेतली. पुन्हा वाटचाल सुरू. पिअरी आणि हेन्सन या दोघांनाही बर्फातील आंधळेपणाचा त्रास होतच होता. पुढे पुढे तर पिअरीला बघणे अशक्य झाले. मोठ्या कष्टाने तासन् तास कागदावरच्या नकाशाचा अभ्यास करून पिअरीने जाहीर केले, ‘ ८९ डिग्रीज–

म्हणजे उत्तर ध्रुवापासून फक्त एक डिग्री अंतरावर आपण उभे आहोत.' म्हणजे ध्येयमंदिर आता फक्त ६० मैल दूर होते.

सगळ्यांच्या अंगात एक नवाच उत्साह संचारला. नव्या उमेदीने ताकद गोळा करून त्यांनी कुत्र्यांना हाकारले. पहिल्या दिवशी २५ मैल काटले. दुसऱ्या दिवशी १५ मैलांची मजल झाली. आता एका टप्प्यात ध्येयमंदिर– उत्तर ध्रुवाचे ते टोक– गाठता येईल! त्या भूमीवर पहिले मानवाचे पाऊल ठेवता येईल!

ध्येयपूर्तीच्या आनंदाने हेन्सन इतका उत्तेजित झाला, की तो आपला थकवा, आपले गोठलेले शरीर, बर्फांधता– सगळे सगळे विसरला. पुढे पडणारे प्रत्येक पाऊल म्हणजे आता एक उत्तुंग नाट्य होते. त्या नादात आपण कुठे चाललोय हेही त्याच्या लक्षात आले नाही, आणि नुकत्याच गोठलेल्या एका पातळ बर्फाच्या थराच्या काठाशी तो आला. त्याने कुत्र्यांना इशारा केला, 'हक्, हक् !' थोडे अंतर गेल्यावर संकटाचे स्वरूप त्याच्या लक्षात आले. बर्फाचा पातळ थर कडकडा मोडत होता. पण आता मागे फिरणे शक्य नव्हते. कुत्र्यांना घाईने पुढे रेटण्यासाठी हेन्सन जोराने ओरडला, 'हक्, हक्–'

पण कड् कड् कड् कड् असा आवाज झाला, आणि क्षणार्धात हेन्सन रक्त गोठवणाऱ्या पाण्यात पडला. वर येण्यासाठी तो घट्ट बर्फाचा आधार शोधू लागला; पण हाय! पातळ बर्फ त्याच्या वजनाने पुन्हा पुन्हा मोडत होता, एक क्षण हेन्सनला भीती वाटली, पण दुसऱ्याच क्षणी, यश इतक्या जवळ आले असताना ते हातातून हिसकावून घेणाऱ्या दैवाचा अतिशय राग आला. हेन्सन खाली खाली जायला लागला. सगळे संपले असे त्याला वाटले, तोच त्याला कुणी तरी हिसकले, आणि थोड्याच वेळात बर्फाच्या एका

घट्ट तुकड्यावर हेन्सन खेचला गेला. आपले प्राण वाचवणाऱ्या ह्या एस्किमोकडे हेन्सनने कृतज्ञतेने पाहिले, एकच क्षण. लगेच त्यांचा पुढचा मार्ग सुरू झाला. मैलांमागून मैल मागे पडायला लागले !

एव्हाना रॉबर्ट पिअरीही त्याला येऊन मिळाला. आणखी काही मैल संपले आणि पिअरीने थांबून पुन्हा नकाशा उघडला, अधू डोळ्यांनी पुन्हा पुन्हा तपासले, आणि तो एकदम आनंदाने ओरडला. '८९ डिग्री आणि कोनाच्या अंशाचा ५७ वा भाग !' म्हणजे ते उत्तर ध्रुवाच्या टोकावर अखेर आले होते ! मनाशी बाळगलेले बावीस वर्षांचे स्वप्न साकार झाले होते ! आयुष्याचे ध्येय साध्य झाले होते, उत्तर ध्रुवाचा शोध रॉबर्ट पिअरीने प्रथम लावला होता !

'जिकलो, आपण जिकलो !' एवढे बोलून पिअरीने नकाशा गुंडाळला आणि तो झोपी गेला.

हेन्सनही त्याच्या शेजारीच आडवा पडून लगेच गाढ झोपला.

त्यांच्या बरोबरचे एस्किमो मात्र बघत राहिले. हीच का ती जागा ? मैलन् मैल संकटे तुडवीत ते चालत आले, ते याच जागेसाठी ? आयुष्याचे ध्येय, जिद्द–यासाठीच ? इथे काय विशेष आहे तेच त्यांना कळत नव्हते. बघावे तिकडे नुसते बर्फच दिसत होते– मैलन् मैल पसरलेले. पण हे असे बर्फ तर ते राहतात तिथेही शंभर मैलांवर, दोनशे मैलांवर असेच पसरलेले दिसते. एकमेकांकडे आश्चर्याने बघत ते हाच प्रश्न एकमेकांना विचारीत राहिले.

झोपून उठल्यावर पिअरीने आणखी निरीक्षण केले, आणि अखेर आपल्या कमरेला गुंडाळलेले अमेरिकेचे निशाण काढले. मग बरोबरचे एस्किमो आणि सहकारी हेन्सन यांच्या साक्षीने समारंभ-

पूर्वक ते बर्फाच्या ढिगात रोवले.

तो दिवस होता : ९ एप्रिल १९०९.

त्या रात्री पिअरीने आपल्या डायरीत लिहिले,

'अखेर उत्तर ध्रुवावर पोहोचलो. तीन शतकांची मानवाची जिज्ञासा आज पुरी झाली. वीस-बावीस वर्षे मनाशी बाळगलेले माझे स्वप्न साकार झाले. आता हे सगळं इतकं साधं, सोपं वाटतंय. मी इथं पोहोचलोय हे खरंच वाटत नाही!'

पण ते खरे होते. पिअरीने उत्तर ध्रुवाचा शोध लावला होता!

★

८

* * * * * * * * *

## धैर्यधर हेन्री

हेन्रीच्या आयुष्यात तो दिवस सोन्याच्या अक्षरांनी लिहून ठेवावा असा उगवला. रात्रभर त्याला झोप आली नव्हतीच. आदल्या दिवशी संध्याकाळीच डॉक्टरांनी त्याला सांगितलं, की ' उद्या तुला उभं राहता येईल. '

आणि हे ऐकल्यापासून हेन्रीचं मन आनंदानं बहरलं होतं. वयाच्या सव्विसाव्या वर्षी पायांवर उभं राहण्याची संधी त्याला प्रथमच मिळत होती. ही सव्वीस वर्षं त्यानं कशी काढली, काय काय भोगलं याचा चित्रपट त्या रात्री त्याच्या डोळ्यांसमोरून अनेकदा सरकून गेला.

हेन्रीचा जन्म न्यूयॉर्कला झाला, तरी त्याचे आई-वडील मूळचे इटलीचे. इटली सोडून आलेल्या ह्या नापिताला पुत्रजन्माचा आनंद उपभोगता आलाच नाही. कारण मुलगा झाला खरा, पण तो जन्मतःच पंगू होता. हात, नाक, डोळे, सगळं ठाकठीक

होतं, पण पाय ?

पायाच्या ठिकाणी फक्त दोन लहान खुंट तेवढे होते.

मग आईच्या कुशीत वाढण्याऐवजी हेन्री हॉस्पिटलमध्येच वाढला. वयाची सात वर्षं त्याने हॉस्पिटलमध्ये काढली. या काळात त्याच्या पायांवर अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या; पण कशाचाच फारसा उपयोग झाला नाही.

आणि मग पंगू अवस्थेतच हेन्रीचं शालेय शिक्षण पार पडलं. इतर मुलं धावत, पळत, दंगामस्ती करीत. कुणी तरी उचलून आणून खुर्चीत ठेवलेला हेन्री आसुसलेल्या डोळ्यांनी ते नुसतं पाहात राही. त्या मुलांच्या बरोबर जावं, धावावं, उड्या माराव्या अशी त्याला अतिशय इच्छा होई; पण काय करणार ? तो मग ओरडून मुलांना आपल्याजवळ बोलावी. पण मुलं त्याच्यापासून दूर पळत. त्याला चिडवीत. त्याच्या पंगूपणाचा सारखा उल्लेख करीत. त्यानं मुलांना खेळायला बोलावलं, की ' जा रे माकडोबा, तुझ्याबरोबर कोण खेळतंय ! ' असं म्हणून त्याच्या डोक्यावर टपली मारीत, आणि मग दूर पळत जाऊन ' हिप् हिप् हुर्रे ऽ ' करून ओरडत !

घरीदारी सगळेजण त्याच्या व्यंगाची हेटाळणी करीत. वास्तविक यात हेन्रीचा काय दोष होता बरं ? जसा हेटाळणी करणाऱ्या लोकांचा त्रास होई, तसाच त्याच्याबद्दल फाजील सहानुभूती दाखवणाऱ्या लोकांचाही होई. प्रत्येकजण आपापल्या परीनं अनेक उपाय सुचवी. सहानुभूतीच्या नावाखाली त्याच्या दुर्दैवाची त्याला सारखी जाणीव करून देत.

हेन्रीला हे सगळं असह्य होई. नको हे जगणं, असंही त्याला अनेकदा वाटून गेलं. पण या सगळ्यांतून हेन्री व्हिस्कार्डी सावरला,

८

*　*　*　*　*　*　*　*　*

## धैर्यधर हेन्री

हेन्रीच्या आयुष्यात तो दिवस सोन्याच्या अक्षरांनी लिहून ठेवावा असा उगवला. रात्रभर त्याला झोप आली नव्हतीच. आदल्या दिवशी संध्याकाळीच डॉक्टरांनी त्याला सांगितलं, की ' उद्या तुला उभं राहता येईल. '

आणि हे ऐकल्यापासून हेन्रीचं मन आनंदानं बहरलं होतं. वयाच्या सव्विसाव्या वर्षी पायांवर उभं राहण्याची संधी त्याला प्रथमच मिळत होती. ही सव्वीस वर्षं त्यानं कशी काढली, काय काय भोगलं याचा चित्रपट त्या रात्री त्याच्या डोळ्यांसमोरून अनेकदा सरकून गेला.

हेन्रीचा जन्म न्यूयॉर्कला झाला, तरी त्याचे आई-वडील मूळचे इटलीचे. इटली सोडून आलेल्या ह्या नापिताला पुत्रजन्माचा आनंद उपभोगता आलाच नाही. कारण मुलगा झाला खरा, पण तो जन्मतःच पंगू होता. हात, नाक, डोळे, सगळं ठाकठीक

होतं, पण पाय ?

पायाच्या ठिकाणी फक्त दोन लहान खुंट तेवढे होते.

मग आईच्या कुशीत वाढण्याऐवजी हेन्री हॉस्पिटलमध्येच वाढला. वयाची सात वर्षं त्याने हॉस्पिटलमध्ये काढली. या काळात त्याच्या पायांवर अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या; पण कशाचाच फारसा उपयोग झाला नाही.

आणि मग पंगू अवस्थेतच हेन्रीचं शालेय शिक्षण पार पडलं. इतर मुलं धावत, पळत, दंगामस्ती करीत. कुणी तरी उचलून आणून खुर्चीत ठेवलेला हेन्री आसुसलेल्या डोळ्यांनी ते नुसतं पाहात राही. त्या मुलांच्या बरोबर जावं, धावावं, उड्या माराव्या अशी त्याला अतिशय इच्छा होई; पण काय करणार ? तो मग ओरडून मुलांना आपल्याजवळ बोलावी. पण मुलं त्याच्यापासून दूर पळत. त्याला चिडवीत. त्याच्या पंगूपणाचा सारखा उल्लेख करीत. त्यानं मुलांना खेळायला बोलावलं, की ' जा रे माकडोबा, तुझ्याबरोबर कोण खेळतंय ! ' असं म्हणून त्याच्या डोक्यावर टपली मारीत, आणि मग दूर पळत जाऊन ' हिप् हिप् हुर्रे ऽ ' करून ओरडत !

घरीदारी सगळेजण त्याच्या व्यंगाची हेटाळणी करीत. वास्तविक यात हेन्रीचा काय दोष होता बरं ? जसा हेटाळणी करणाऱ्या लोकांचा त्रास होई, तसाच त्याच्याबद्दल फाजील सहानुभूती दाखवणाऱ्या लोकांचाही होई. प्रत्येकजण आपापल्या परीनं अनेक उपाय सुचवी. सहानुभूतीच्या नावाखाली त्याच्या दुर्दैवाची त्याला सारखी जाणीव करून देत.

हेन्रीला हे सगळं असह्य होई. नको हे जगणं, असंही त्याला अनेकदा वाटून गेलं. पण या सगळ्यांतून हेन्री व्हिस्कार्डी सावरला,

तो त्याच्या आईमुळे. त्या माउलीनं त्याच्यासाठी अपार कष्ट तर घेतलेच, पण त्याला अपरंपार प्रेम दिलं. त्याला मित्र नव्हते, तर ती त्याचा मित्र झाली. त्याला पाय नव्हते, तर ती त्याचा आधार झाली. त्याच्या पंगू झालेल्या मनालाही तिने वारंवार धीर देऊन सावरलं. तिच्याकडून मिळालेल्या अपार प्रेमामुळेच तो हळूहळू सगळ्यांकडे दुर्लक्ष करायला शिकला. लोकांची दया दूर सारून आहे ती परिस्थिती तशीच स्वीकारण्याचं धैर्य त्यानं दाखवलं आणि जगण्याची– नुसतं जगण्याची नव्हे, तर चांगलं जगण्याची जिद्द मनाशी बाळगली. आणि तो फोर्डहॅम विद्यापीठात दाखल झाला.

तिथे बास्केटबॉलचा पंच म्हणून त्यानं काम केलं. त्याबरोबरच न्यूयॉर्क टाइम्समध्ये क्रीडाविषयक मजकूर लिहायला सुरुवात केली, आणि आपल्या चरितार्थापुरते पैसे तो मिळवू लागला. पैसे मिळवीत असतानाच एकीकडे त्यानं तीन वर्षं कायद्याचा अभ्यास केला, आणि तो सरकारी कर-पंडित झाला. हळूहळू हेन्रीला मान, प्रतिष्ठा व पैसा मिळू लागला.

पण याच सुमारास त्याच्या दुर्दैवानं पुन्हा उचल खाल्ली. त्याच्या पायांचे खुंट झिजत चालले. असेच झिजत गेले, तर लवकरच पायांची हालचाल पूर्णपणे थांबेल, असं डॉक्टरांनी सांगितलं. म्हणजे मग जन्मभर हेन्रीला चाकाच्या खुर्चीत बसून आयुष्य काढावं लागलं असतं. उभं राहणं– ताठ उभं राहणं हे कधीच शक्य झालं नसतं.

हेन्रीनं अनेक डॉक्टरांचा सल्ला घेतला. पण कुणालाही त्यावर खात्रीलायक उपाय सापडेना. अखेर रॉबर्ट आर. यॅनोव्हर यांनी एक उपाय सुचवला. तो म्हणजे कृत्रिम पाय तयार करून

वसवणे !

हेन्री आनंदानं या गोष्टीला तयार झाला. आणि डॉ. रॉबर्टनी त्याला कृत्रिम पाय तयार करून दिले.

आणि ते पाय आपल्या पायांच्या खुंटांवर चढवून हेन्री प्रथम ताठ उभा राहिला. तो दिवस त्याच्या आयुष्यात सोन्याचा ठरला. आरशापुढे उभे राहून हेन्री पुन्हा पुन्हा आपली छबी पाहत होता. त्याचा स्वतःवर विश्वासच बसत नव्हता. वयाच्या सव्वीस वर्षांपर्यंत अवघी तीन फूट आठ इंच असलेली उंची वाढून आता ती पाच फूट आठ इंच झाली होती. या पायांवर पँट चढवल्यावर हेन्रीचे पाय कृत्रिम आहेत हे कुणालाही कळणार नव्हते. आता त्याची हेटाळणी होणार नव्हती कुचेष्टा होणार नव्हती. खोटी सहानुभूतीही कुणी दाखवणार नव्हते.

कारण हेन्री आता इतर चार-चौघांसारखा दिसत होता. चार-चौघांसारखाच तो आता हिंडूफिरू शकत होता. डॉ. रॉबर्टनी त्याला माणसांत आणलं. जगण्याचा आणखी हुरूप दिला. हेन्रीनं या कामाचे पैसे त्यांना देऊ केले. पण डॉक्टरांनी तेही घेतले नाहीत. त्यांनी त्याच्या खांद्यावर थोपटत सांगितलं,

‘ हेन्री, मी विशेष काहीच केलं नाही. पण तुला जर काही वाटतच असेल तर तुझ्यासारख्याच अपंग लोकांसाठी तू काही तरी कर, म्हणजे मग माझे पैसे फिटल्यासारखेच आहेत. ’

हेन्रीनं ते शब्द मानले, आणि दुसऱ्या महायुद्धात तो रेडक्रॉस-मधे फील्ड ऑफिसर म्हणून दाखल झाला. वॉशिंग्टनमधल्या वॉटरफील्ड हॉस्पिटलमध्ये त्याची नेमणूक झाली. युद्धात हातपाय तुटून आलेल्या सैनिकांसाठी त्यानं इथं काम केलं. त्यांना धीर दिला. आशावादी बनवलं. आहे त्या परिस्थितीत चांगलं जगण्याची

तो त्याच्या आईमुळे. त्या माउलीनं त्याच्यासाठी अपार कष्ट तर घेतलेच, पण त्याला अपरंपार प्रेम दिलं. त्याला मित्र नव्हते, तर ती त्याचा मित्र झाली. त्याला पाय नव्हते, तर ती त्याचा आधार झाली. त्याच्या पंगू झालेल्या मनालाही तिने वारंवार धीर देऊन सावरलं. तिच्याकडून मिळालेल्या अपार प्रेमामुळेच तो हळूहळू सगळ्यांकडे दुर्लक्ष करायला शिकला. लोकांची दया दूर सारून आहे ती परिस्थिती तशीच स्वीकारण्याचं धैर्य त्यानं दाखवलं आणि जगण्याची– नुसतं जगण्याची नव्हे, तर चांगलं जगण्याची जिद्द मनाशी बाळगली. आणि तो फोर्डहॅम विद्यापीठात दाखल झाला.

तिथे बास्केटबॉलचा पंच म्हणून त्यानं काम केलं. त्याबरोबरच न्यूयॉर्क टाइम्समध्ये क्रीडाविषयक मजकूर लिहायला सुरुवात केली, आणि आपल्या चरितार्थापुरते पैसे तो मिळवू लागला. पैसे मिळवीत असतानाच एकीकडे त्यानं तीन वर्षं कायद्याचा अभ्यास केला, आणि तो सरकारी कर-पंडित झाला. हळूहळू हेन्रीला मान, प्रतिष्ठा व पैसा मिळू लागला.

पण याच सुमारास त्याच्या दुर्दैवानं पुन्हा उचल खाल्ली. त्याच्या पायांचे खुंट झिजत चालले. असेच झिजत गेले, तर लवकरच पायांची हालचाल पूर्णपणे थांबेल, असं डॉक्टरांनी सांगितलं. म्हणजे मग जन्मभर हेन्रीला चाकाच्या खुर्चीत बसून आयुष्य काढावं लागलं असतं. उभं राहणं– ताठ उभं राहणं हे कधीच शक्य झालं नसतं.

हेन्रीनं अनेक डॉक्टरांचा सल्ला घेतला. पण कुणालाही त्यावर खात्रीलायक उपाय सापडेना. अखेर रॉबर्ट आर. यॅनोव्हर यांनी एक उपाय सुचवला. तो म्हणजे कृत्रिम पाय तयार करून

बसवणे !

हेन्री आनंदानं या गोष्टीला तयार झाला. आणि डॉ. रॉबर्टनी त्याला कृत्रिम पाय तयार करून दिले.

आणि ते पाय आपल्या पायांच्या खुंटांवर चढवून हेन्री प्रथम ताठ उभा राहिला. तो दिवस त्याच्या आयुष्यात सोन्याचा ठरला. आरशापुढे उभे राहून हेन्री पुन्हा पुन्हा आपली छबी पाहत होता. त्याचा स्वत:वर विश्वासच बसत नव्हता. वयाच्या सव्वीस वर्षांपर्यंत अवघी तीन फूट आठ इंच असलेली उंची वाढून आता ती पाच फूट आठ इंच झाली होती. या पायांवर पँट चढवल्यावर हेन्रीचे पाय कृत्रिम आहेत हे कुणालाही कळणार नव्हते. आता त्याची हेटाळणी होणार नव्हती कुचेष्टा होणार नव्हती. खोटी सहानुभूतीही कुणी दाखवणार नव्हते.

कारण हेन्री आता इतर चार-चौघांसारखा दिसत होता. चार-चौघांसारखाच तो आता हिंडूफिरू शकत होता. डॉ. रॉबर्टनी त्याला माणसांत आणलं. जगण्याचा आणखी हुरूप दिला. हेन्रीनं या कामाचे पैसे त्यांना देऊ केले. पण डॉक्टरांनी तेही घेतले नाहीत. त्यांनी त्याच्या खांद्यावर थोपटत सांगितलं,

' हेन्री, मी विशेष काहीच केलं नाही. पण तुला जर काही वाटतच असेल तर तुझ्यासारख्याच अपंग लोकांसाठी तू काही तरी कर, म्हणजे मग माझे पैसे फिटल्यासारखेच आहेत. '

हेन्रीनं ते शब्द मानले, आणि दुसऱ्या महायुद्धात तो रेडक्रॉस-मधे फील्ड ऑफिसर म्हणून दाखल झाला. वॉशिंग्टनमधल्या वॉटरफील्ड हॉस्पिटलमध्ये त्याची नेमणूक झाली. युद्धात हातपाय तुटून आलेल्या सैनिकांसाठी त्यानं इथं काम केलं. त्यांना धीर दिला. आशावादी बनवलं. आहे त्या परिस्थितीत चांगलं जगण्याची

जिद्द त्यांच्यात निर्माण केली, आणि त्यांना चालायलाही शिकवलं हेन्री सगळ्यांचा लाडका झाला.

युद्धानंतर आणखीनही काही ठिकाणी त्यानं नोकरी केली. या दरम्यानच्या काळात त्याचं लग्न होऊन त्याला दोन गोजिरवाण्या मुलीही झाल्या. ल्युसिलनं– त्याच्या पत्नीनं– त्याला योग्य ती साथ दिली. तिच्या मदतीनंच त्यानं स्वतःचं छोटंसं घरकुल बांधलं. त्या घरकुलात तिनं नंदनवन निर्माण केलं. आयुष्यभराचे कष्ट विसरावेत इतकं समाधान आता हेन्रीला मिळत होतं. व्यवसाय-धंद्यातही त्याने कीर्ती मिळविली. बर्लिंग्टन मिलचा तो संचालक झाला. तरी देखील अपंगांसाठी आपण काही करावे ही ओढ होतीच. त्यामुळे १९४९ मध्ये डॉ. रस्क यांनी ' जस्ट वन ब्रेक ' या संस्थेत काम करण्यासाठी त्याला बोलावले, तेव्हा क्षणाचाही विचार न करता हेन्री आपला भरभराटीचा धंदा सोडून या संस्थेला येऊन मिळाला.

ही संस्था पंगू स्त्री-पुरुषांना रोजगार मिळवून देत असे. वास्तविक माणसाचा एखादा अवयव निकामी झाला तरी त्याचे इतर अवयव पूर्णपणे कार्यक्षम असतात. किंबहुना एखादे वैगुण्य असलेला माणूस आपले वैगुण्य भरून काढण्यासाठी अधिक प्रामाणिकपणाने, मन लावून काम करतो. पण अपंगांना काम देण्यासाठी लोक नेहमीच नाराज असतात. वणवण करूनही त्यांना काम मिळत नाही, आणि मग नाइलाजानं त्यांना दुसऱ्यापुढे मदतीसाठी हात पसरावे लागतात.

' जस्ट वन ब्रेक ' या संस्थेत काही दिवस काम केल्यावर हेन्रीनं स्वतःची ' ॲबिलिटिज इन्कॉर्पोरेटेड ' ही संस्था काढली. लाँग आयलंडवरील एका रिकाम्या तबेल्याची जागा त्याने या

संस्थेसाठी आठ हजार डॉलर्स देऊन घेतली. हे पैसे त्याने अर्थातच उसनवार जमा केले होते, आणि त्यात काम करणारे सगळे कामगार अपंग होते.

सुरुवातीला या संस्थेला खूपच अडचणींतून जावं लागलं. कामाच्या ऑर्डर्स मिळविण्यासाठी व त्या पुऱ्या करण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागले. पण दीर्घोद्योग, हरहुन्नरीपणा आणि दुर्दम्य उत्साही वृत्ती यांतून ही संस्था वाढत गेली आणि जगातील पंगू लोकांना आपल्या पायांवर उभं राहण्याची संधी मिळाली.

★

म. प्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १८१९६ नों. दि. ........
वि. ८१।८१ - गा. ..................

# आमच्या प्रकाशनाचे निवडक कुमार-वाङ्मय

**योगिनी जोगळेकर**

| | |
|---|---|
| मातृसेवा | ३–०० |
| गुरुशिष्य | ३–०० |
| तिळगूळ | ३–०० |
| खंडू खोडसाळे | ४–०० |

**प्रभाकर अत्रे**

| | |
|---|---|
| जे श्रीहरीसाठी मेले | ४–०० |

**अशोक देशपांडे**

| | |
|---|---|
| विजयंता भारत | ३–५० |
| भाग १ ते ४ | प्रत्येकी |

**शं. रा. देवळे**

| | |
|---|---|
| दैव जाणिले कुणी | ४–०० |
| सरदार धनाजीराव | ४–०० |

**ल. रा. गोडबोले**

| | |
|---|---|
| अपूर्व भेट | ३–०० |
| परेशचे पाताळातील पर्यटन | २–५० |

**सौ. शैलजा राजे**

| | |
|---|---|
| सोन्याचा बूट | ३–०० |
| गुलाबकळी रुसली | ३–०० |

**सौ. नलिनी सहस्रबुद्धे**

| | |
|---|---|
| सूर्यफूल व इतर गोष्टी | ३–०० |
| कारल्यातील माणिक | ३–०० |

**भा. द. खेर**

| | |
|---|---|
| चक्रव्यूह | ४–०० |

**सौ. तारा कुलकर्णी**

| | |
|---|---|
| पांगळा राघव | ३–०० |

**सौ. मुक्ता केणेकर**

| | |
|---|---|
| मला फक्त एक बदूक द्या | २–५० |
| पप्पांचा रेडिओ | ३–०० |

**सौ. संजीवनी मराठे**

| | |
|---|---|
| लाडकी लेक | ३–०० |

**पंढरीनाथ रेगे**

| | |
|---|---|
| मनोहर कथा | २–५० |

**वि. के. फडके**

| | |
|---|---|
| सुलतानाचा न्याय | ३–०० |

**मा. गो. काटकर**

| | |
|---|---|
| साहस कथा | २–५० |

**केशव रा. फडणीस**

| | |
|---|---|
| देवदूत | ३–०० |

**ना. स. करंदीकर**

| | |
|---|---|
| राणी रासमणी | ३–०० |

**रमेश मुधोळकर**

| | |
|---|---|
| शामू सर्कसवाला | ४–०० |

**वि. भा. नेमाडे**

| | |
|---|---|
| दुधाचा झरा | ५–०० |

**न. दि. दुगल**

| | |
|---|---|
| एक होती सिंहीण | ४–०० |

**सुधाकर प्रभू**

| | |
|---|---|
| वाढदिवसाची भेट | ४–०० |
| छोटा नटसम्राट | ४–०० |

**संजय प्रकाश**

IRBK-0117167

IRBK-0117167